
Neutral View
# येवा कोकणात
पाक्षिक
शुक्रवार, दि. ०९ फेब्रुवारी २०१८ | वर्ष: १ अंक: २ | किंमत: रु. १० | आर.एन.आय.क्र.GOAMAR00186



# सिंधुदुर्गातील 'कातळशिल्प' एक अलौकिक ठेवा

– रविंद्र रावराणे, मुंबई

जातिवंत भटक्याला "तिकडे पाहण्यासारखं काहीतरी आहे" हे एक वाक्य कानावर पडलं कि ते ठिकाण किंवा ती वस्तू पाहून येत नाही तोपर्यंत मन स्वस्थ बसू देत नाही. असच आम्हा भटक्यांना नेहमीच काहीना काही वेगवेगळ्या ठिकाणाची माहिती कुठे तरी वाचनात येत असते किंवा दुसऱ्या भटक्यांच्या तोंडून ऐकायला मिळत असते, मग सुरु होतो खरा प्रवास, त्या ठिकाणाबद्दल आपल्या नेहमीच्या भटक्यांना सांगणे , त्याची अधिक माहिती जमवणे, त्यासाठी सर्वांना तयार करणं . हा सगळा खेळ ते ठिकाण प्रत्यक्षात पाहून येत नाही तोपर्यंत चालू असतो.

ह्या वेळची आमची भटकंती हि विशेष होती. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातळशिल्प ह्याबद्दल काहीदिवसापूर्वी फेसबुक वर वाचनात आलं होत आणि उत्सुकता वाढली होती, कारण ज्या जिल्ह्यात माझा जन्म झाला, शिक्षण झालं त्या भागातील असा ऐतिहासिक ठेवा दुर्लक्षित राहून अनेक अभ्यासक व शिल्पप्रेमी यांच्यापासून लांब रहिला. ह्याबद्दल मी आमचे नेहमीचे सहकारी श्वेता सावंत यांना सांगितलं आणि त्यांच्याकडूनही होकार मिळाला. त्यांनी अधिक माहिती काढली आणि जायचं हे नक्की झालं . मालवण तालुक्यातील कुडोपी ह्या गावाच्या धनगरवाडयाच्या वरती ओसाड माळरानावर म्हणजेच सड्यावर हि कातळशिल्प आपल्याला पाहायला मिळतात. कणकवली आचरा ह्या रस्त्यावरून वाटेत लागणाऱ्या त्रिंबक आणि चिंदर ह्या गावातून कुडोपीला जात येते पण चिंदर येथून गेल्यावर कुडोपी गावातील सडा हे अंतर लांब आहे त्यामुळे त्रिंबक येथून कुडोपी धनगरवाडा विचारून सड्यावर जाता येते, हि वाट सोप्पी आहे. मालवण ते कुडोपी आणि कणकवली ते कुडोपी हे अंतर साधारण तीस किलोमीटर आहे.

नेहमीप्रमाणे किरण परब आणि स्नेहा ह्या आमच्या सोबतीला होते विचारत विचारत आम्ही त्या ओसाड माळरानावर जाऊन पोचलो. आता प्रश्न होता कि पुढे माहिती देणारा इथे कोण सापडेल का? अंदाज लावत लावत आम्ही एका चिरे खनिजवळ येऊन पोचलो, जाणाऱ्या भटक्यांनी चिरेखन हे लँडमार्क म्हणून लक्षात ठेवा. तिथूनच उजव्या बाजूला जाणारी वाट हि सड्यावर जाते. शोधक नजरेनं आम्ही गाव शोधत गेलो आणि गाव नजरेस पडल्यावर काहीतरी सापडल्याचे समाधान मिळाले. तिथेच एक काका गवत कापत होते त्यांना विचारलं असता त्यांनी स्वतः येऊन दाखवतो असे सांगितले आणि ते आमच्यासोबत आले. एवढ्या निर्जन स्थळी जर ते काका आमच्या सोबतीला आले नसते तर कदाचित कातळशिल्प न पाहता मागे जावं लागलं असत. म्हणून गावातून वाटाड्या हा घ्यावाच. त्या काकांच्या मदतीने आम्ही त्या कातळशिल्प असलेल्या ठिकाणी पोचलो. त्या भागात गवत वाढलेले असल्यामुळे मोठं मातृदेवतेच शिल्प आपल्याला नीट पाहता येत नाही. स्थानिक लोक हि शिल्प पांडवकालीन आहेत असे सांगतात आणि कोकणात सगळीकडे ऐकायला मिळणारी कथा म्हणजे "हे एका रात्रीत केले आहे, सकाळी कोंबडा आरवला म्हणून हे अर्धच सोडून गेले असे" असे सौबत आलेले काका आम्हाला सांगत होते. खरी शोकांतिका हि आहे कि स्थानिक आणि आजूबाजूच्या लोकांना ह्याबद्दल माहिती नव्हती. जर स्थानिक अश्याठिकाणी पोचले नसतील तर ते येणाऱ्या पर्यटकांना काय सांगणार. संशोधकांच्या मते हा सात हजार वर्षांपूर्वीचा ठेवा आहे. ह्या माळावरचे हे मातृदेवतेचे शिल्प हे भारतातील एकमेव शिल्प आहे असे जाणकार सांगतात. ह्यात पक्षी, चित्रविचित्र आकृती असे अनेक शिल्प तेथे कोरण्यात आले आहेत. ह्याचे अभ्यासक कोल्हापूरचे माहिती संचालक सतीश लळीत यांनी हा ठेवा सर्वांसमोर आणला आहे. क्षितीजापर्यंतर पसरलेला सडा आणि त्यावरील पिवळे गवत नजरेत मावत नव्हत.

कुडोपी येथील माळरानावर सुमारे साठ शिल्प कोरण्यात आली आहेत गवत वाढलं असल्यामुळे आणि अंधार होत आल्यामुळे ती सर्व पाहन शक्य झाली नाहीत. गोव्यातील उसगाळीमळ, महाराष्ट्र गोवा सीमेवरील विर्डी, हिवाळे, कुडोपी, खानवली (राजापूर), निवळी (रत्नागिरी) अशा अनेक ठिकाणी किनारपट्टी भागात कातळशिल्पे आढळली असून त्यांचा परस्परसंबंध असण्याची शक्यता लळीत यांनी व्यक्त केली आहेत. कुडोपी आणि हिवाळे यासारखी अनेक ठिकाणे हि किनारपट्टी भागात आहेत याचे अधिक संशोधन होणे गरजेचे आहे, अधिक संशोधन झाल्यास कोकण प्रदेशाच्या इतिहासावर अधिक भर पडेल. पर्यटनदृष्ट्या विकसित केल्यास जिल्ह्याच्या पर्यटन विकासालाही चालना मिळेल. काही जाणकारांच्या मते आजूबाजूला म्हणजेच बुधवळे, पळसंब, त्रिंबक या गावांच्या काळथर दगडात अशी अनेक शिल्प आहेत. आजवर फिरताना अनेक ठिकाणी आलेला अनुभव म्हणजे गावात काही ऐतिहासिक ठिकाण किंवा काही वस्तू असली तर ती स्थानिकांनाच माहित नसते. कोकणातला धुवाधार पाऊस, सड्यावरचा ठिसूळ दगड, वारा, गवत यांच्याशी झुंज देत ही चित्र हजारो वर्ष तशीच पडली आहेत आज त्यातील बरीच चित्र नष्ट झाली आहेत, पुसट झाली आहेत. आता जर या चित्रांचे योग्य संरक्षण केल नाही तर उरलेला आपला हा राष्ट्रीय ठेवा सुध्दा नष्ट होईल. आज हि शिल्प प्रकाशात येण्याची गरज आहे कारण स्थानिक पर्यटन वाढीसाठी हा ऐतिहासिक ठेवा नक्की उपयोगी पडेल आणि ह्या भागाचं नाव पर्यटनदृष्ट्या नकाशावर येईल .

<u>कोकणातील अन्य शिल्पे:</u>

सिंधुदुर्गप्रमाणे कोकणातील ठाणे, रायगड आणि रत्नागिरी या अन्य जिल्ह्यातही विविध ठिकाणी जांभा पाषाणावरकोरलेली लक्षणीय अशी चित्रे, नकाशे, काष्ठ शिल्पे, गुहा, लेणी, मंदिरे आढळून येतात. मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर हातखंब्याच्या पुढे निवळी तिठ्याजवळ जांभा दगडावर कोरलेला एक भला मोठा पथदर्शक नकाशाहा कुतुहलाचा विषय होता. रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यात एकेकाळी बंदर असलेल्या बारसू या गावातील मोठ्या डोंगरावर असलेली कोरीव चित्रे ऐतिहासिक अभ्यासकांना व संशोधकांना आजवर एक आव्हान ठरली आहेत. कोकणातील पाषाण प्रस्तरावर निर्मित झालेली चित्र व शिल्प संस्कृती ही वैविध्यपूर्ण असून ती फारच अतिप्राचीन आहे. या कलात्मक संस्कृतीची निश्चित कालगणनाही अद्याप झालेली नाही. तसेच ही कलानिर्मिती कोणत्या कारणासाठी, कधी, कोणासाठी निर्माण झाली आणि कोणी निर्माण केली, याबद्दलचे ठोस पुरावे अद्याप पर्यंत उपलब्ध झालेले नाहीत किंवा त्यांचा साधा मागमूसही सापडलेला नाही. कोकण किनारपट्टीवरील हिवाळे आणि कुडोपीसारखी अनेक ठिकाणे पुरातत्वीय दृष्ट्या खूप महत्वाची असून ती या भागातील आदिम मानवी समूह व त्यांची वसतीस्थाने यांच्याबद्दल माहिती उपलब्ध करून देऊ शकतील. मात्र, या ठिकाणांचे तज्ज्ञांकडून सातत्याने परिक्षण होणे, हाती येणाऱ्या माहितीचा संयुक्तिक अर्थ लावणे, त्यांचा कालावधी निश्चित करणे इत्यादी बाबींवरलक्ष केंद्रीत करावे लागेल. अशा प्रकारच्या संशोधनामुळे कोकण प्रांताच्या इतिहासावर अधिक प्रकाश पडण्याची शक्यता आहे.









# मागोवा



# माझे डोंगरी शेत ग..!


संपादरवर्षी जंगलातील एखाद्या तुकड्याची गावाने मिळून निवड करायची. तळपत्या उन्हात झाड-झुडप तोडून तो साफ करायचा. हा जंगली कचरा वाळला कि त्यालाच आग लाऊन जमिनीची मशागत करायची. डोंगरातील हि जमीन अशाप्रकारे शेतीलायक बनवायची. पाऊस पडताच याच जमिनीत नाचणी, वरी पेरायची आणि चार-पाच महिन्यांनी पिक हातात येनची वाट बघत बसायची. फारशी मेहनत नाही, फारसे खात नाही. करावी लागलीच तर राखण. कोकणातील डोंगर उतारावरची हि शेती आजही त्या दिवसांची आठवण करून देते.

डोंगरी शेती म्हणजे स्थलांतरित शेती. खूप तीव्र उताराच्या जमिनीवर अशी शेती केली जाते. जगभरात दक्षिण अमेरिका आणि आग्नेय आशियातल्या पर्वतीय प्रदेशात हि शेतीच तेथील लोकांच्या उपजीविकेचे साधन आहे. भारतात प्रामुख्याने ईशान्येकडील याज्यात डोंगर शेती केली जाते. त्यात प्रामुख्याने नागालँड, मिझोरम, मणिपूर,अरुणाचलप्रदेश या हिमालयाच्या पायथ्याच्या राज्यांचा समावेश आहे. ओरिसातही डोंगर शेती केली जाते. या भागात राहणाऱ्या आदिवासी जमाती मुख्यता डोंगर शेती करतात. सह्याद्री पर्वत रांगेतील कर्नाटक आणि केरळ या राज्यात डोंगर शेती केली जाते. मात्र ti तुरळक प्रमाणात आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने कोकण प्रदेशात डोंगर शेती मोठ्या प्रमाणावर केली जात असे. अलीकडे त्याचे प्रमाण कमी झाले असले तरी सह्याद्री पर्वत रांगेत वसलेल्या गावात आजही हि शेती पद्धत आपली परंपरा जोपासून आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या डोंगरी लोकवस्तीत हि शेती दिसून येते. शेकडो वर्षापासून हि शेती केली जात आहे. केवळ पिक घ्यायचं म्हणून हि शेती केली जात नाही तर येथील लोकांच्या जगण्याची ती गरज आहे. जिथे गावच डोंगरात वसले आहे तिथे शेतीसाठी सपाट जागा कुठून असणार, अशा ठिकाणी डोंगर शेती हेच उपजीविकेच साधन आहे. या शेतीत आता गरजेनुसार बदल झालेत म्हणा, परंतु ti अजूनही आपला तग धरून आहे हे अत्यंत म्हत्वाचे आहे. अनेक शेती तज्ञांना हि डोंगर शेती म्हणजे मुख्य शेतीला पूरक शेती आहे असे वाटत होते मात्र हि शेती देखील येथील लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे किंबहुना तीही मुख्य शेती आहे हे खूप नंतर पटायला लागल. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार केला तर वैभववाडी, कणकवली, दोडामार्ग, कुडाळ या तालुक्यातील सह्याद्री पर्वत रांगेतील गावात डोंगर शेती केली जाते. वैभववाडी तालुक्यात गाव असलेल्या प्रशिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतही डोंगर शेतीचा उल्लेख सापडतो.

डोंगर शेतीच्या बाबतीत ईशान्य भारतातील शेतीवर मोठे संशोधन झाले असून या प्रकारच्या शेतीतील पिकांच्या विविध स्थानिक व पारंपरिक जातींमुळे महत्वाचे जीवावैविध्य टिकवून टिकवून ठेवण्यासाठी मदत झाली आहे. हे या संशोधनातून समोर आले आहे. परंतु या धर्तीवर कोकणातील शेतीवर संशोधन झाले नाही. ते झाल्यास येथील शेतीमधील अनेक गोष्टी आपल्या समोर येतल. त्यातून या शेतीचे अनेक अकल्पित पैलू समजायला मदत होईल. या शेती पद्धतीत गावाच्या सामाईक म्ल्कीच्या जंगलाच्या तुकड्यातून किवा वेगवेगळ्या कुटुंबाच्या मालकीच्या जमिनीची मार्च महिन्याच्या दरम्याने निवड केली जाते. त्यानंतर सार्वजन मिळून त्यावरील जंगल तोडून ती जमीन साफ करतात त्यातील मोठी लाकडे जळणासाठी वापरली जातात. उरलेला पाला-पाचोळा जमिनीच्या भाजवळ कमी उपयोगी पडतो. जूनचा पहिल्या आठवड्यात पेरणी केली जाते. जुलै, ऑगष्ट महिन्यात रोपे तयार होतात. एक दोन वेळा बेनावळ केली जाते. भजावळीने जमीन भूसभूसित झालेली असते त्यामुळे तिला फारशी नांगरणी करावी लागतं नाही. केवळ राख आणि माती मिसळण्यापुरती नांगरणी केली जाते. अशा निवडलेल्या शेतात केवळ एकच वर्ष शेती केली जाते. दुसऱ्या वर्षी पुन्हा नवीन जंगल शोधून ते तोडलं जात. तिथे पुन्हा नव्याने मशागत केली जाते आणि शेत केल जात. मात्र गावाच्या मालकीच्या शेत्रात हि शेती करावी लागतं असल्याने पुन्हा काही वर्षांनी त्याच पहिल्या तुकड्यात शेती करायला यावं लागतं. हे चक्र असंच चालू राहत. रत्नागिरी जिल्ह्यात साधारणता ६ ते ७ वर्षांनी त्याच जमिनीत पुन्हा शेती केली जाते तर सिंधुदुर्ग जिल्हात ७ ते ८ वर्षांनी त्याच पहिल्या तुकड्यात शेती केली जाते. या कालावधीत जमिनीच्या त्या तुकड्यावर पुन्हा जंगल वाढते. जमिनीच्या मशागतीला आणि जळावू लाकडाना नवे साधन मिळते. या चक्रात आणखी एक घडत ते म्हणजे जमिनीची नैसर्गिक मशागत होते. त्या ७ ते ८ वर्षात झाडांचा पाला पाचोळा जमिनीत कुजतो आणि जमीन नव्याने पोषण द्रव्यांनी युक्त होते. त्यावर घेतले जाणारे पिक अत्यंत भरदार येते. कोकणातील या दोन्ही जिल्ह्यात प्रामुख्याने नाचणी, वरी, कांग, कुळीथ, उडीद अशी पिके घेतली जातात. नाचणी हे यातील मुख्य पिक असल्याने या शेतीची नागली शेती म्हणूनही ओळख आहे. बियाण्यांच्या पारंपरिक जाती या शेतीतून जोपासल्या जात आहेत. अलीकडे शेतीचे हे क्षेत्र कमी झाले आणि त्यात काही जातीही कमी झाल्या. कांग तर कोकणातून कधीच हद्दपार झाला आहे. काही किरकोळ ठिकाणी कांग केला जातो. पूर्वी कोकणात भाताच्या अनेक जाती केल्या जात असत त्यातील “बेळा” जातीच्या भाताची शेती डोंगरात केली जात असे. त्यासोबतच हरिक, बरिक, राळे अशी शेतीही केली जात असे. कोकणात हि शेती आता पहायला मिळत नाही. कोकणातील नाचणी शेतीचा आढावा घेतला तर अनेक शेती तज्ञांच्या मते नाचणीच्या १६ जाती सापडतात. मात्र त्यातील आता काहीच जाती अस्थित्वात आहेत. नाचणीची भाकरी कोकणी माणसाच्या जेवणात असतेच. नाचणी हि मधुमेहाच्या रुग्णाला अत्यंत उपयुक्त आहे. डॉक्टर लोकही मधुमेहाच्या रुग्णाला नाचणीची भाकरी खाण्याचा सल्ला देतात.

आधुनिक शेती पद्धतीमुळे शेतीची उत्पादकता वाढली परिणामी शेती शेत्रच कमी झाले. कोकणातील या बदलत्या प्रवाहात येथील हि डोंगर शेतीही सापडली आहे. या शेतीला मनुष्यबळ खूप लागतं. तसेच हि शेती करणारे लोक हे बहितांशी दारिद्र्य रेषेखालील आहेत, त्यांच्यातील पैशाची गरज पुरण करण्यासाठी कुटुंबातला एकतरी तरुण शहर गाठतो परिणामी मनुष्यबळ पुरेशे मिळत नाही. त्यामुळे आता मनुष्यबळाची कमतरता असल्यानेही या शेतीपासून इथला शेतकरी दूर चालला आहे. तामुळे शेती क्षेत्रही आकसत चालले आहे. आणिक गावात आता हाताच्या बोटावर मोजण्याईतकीच कुटुंबे डोंगर शेती करतात. त्यात डोंगरातील कमी झालेले शेती क्षेत्र, बेसुमार जंगलतोड, त्यामुळे जंगलात खायला काही न उरणे याचा परिणाम, जंगली प्राणी या शेतीचे नुकसान करू लागले. त्यामुळे भविष्यात जि कुटुंबे या शेतीत आहेत तीही राहतील याची शक्यता कमीच.

ईशान्य भारतातील नागालँड मध्ये डोंगर शेतीच तिथला प्रमुख व्यवसाय आहे. तिथल राज्यसरकार तिथल्या लोकांच्या मदतीने या शेती पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न करत आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि शेतीतून आर्थिक उन्नती साधण्यासाठी येथील सरकारने विविध योजना अमलात आणल्या आहेत. पहिल्या किवा दुसऱ्या वर्षापासून सोडून दिलेल्या जमिनीवर सहा-सात वर्षात उत्पन्न देऊ शकतील असी फळझाडे किवा इमारतीसाठी लाकडाची झाडे लावून त्यातून शेतकऱ्याचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याची योजना आहे. फळझाडे सहा-सात वर्षांनी ण तोडता त्याच्या मधल्या जागर्त शेती करता येते का? अशा तऱ्हेच्या नव्या संकल्पना राबवून येथील लोकांचा विकास साधण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्याचबरोबर शेतीची उत्पादन क्षमता वाढवून उत्पादित झालेला माल बाजारपेठेत नेणे आणि त्याच्या विक्रीची व्यवस्था करणे अशा विविध प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम राबवून नागा शेतकऱ्यांना या शेतीत टिकवून ठेवले जात आहे. त्यामुळे अजिबात सपाट जमीन नसतानाही नागा शेतकऱ्यांची हि शेती टिकून आहे. आर्थिक उत्पन्नही देत आहे. अशा शेतीच्या जवळ या धर्तीवर योजना आखून कोकणातील शेतकऱ्याला नेता येवू शकत. कारण हि शेती नष्ट होण फायद्यापेक्षा तोट्याच जास्त आहे. या शेतीत पिकणाऱ्या धान्यातून अनेक जीवनसत्वे आणि कष्टकरी लोकांना दिवसभर उर्जा पुरविणारी पिके मिळत होती. आरोग्यदाई धान्य आजच्या केमिकल युक्त खतांच्या जमान्यात मिळणे कठीण होवून बसले आहे .त्यात हि शेतीच एक आशादी होती मात्र त्यावरची अवकळा दूर होण्यासाठी संशोधन होतानाच विविध योजना राबवून शेतकऱ्याला या शेतीकडे नव्याने पाहण्याची दृष्टी देण्याची गरज आहे.



Printed and Published by Neutral View Pvt. Ltd. Printed at Elegant Offset Printers Pvt. Ltd., D2-31, Tivim Industrial Estate, Karaswada, Mapusa-Goa 403526
Editor: Vivek Tamhankar (Responsible under PRB Act) Head Office: Off No. Of/8, 1st Floor, Sapna Garden Co-operative Society, Chogm Road, Porvorim, Alto-Porvorim, Bardez 403521.
Chief Executive Officer: Rupesh Gurudas Samant Creative Head: Vinaya Walavalkar Mantri
Kanakavali Office: Flat No.S3, 2nd Floor, Ashok Residency, Next to Hotel Aroma, Shivaji Nagar, Kanakavali 416602. Mob: 9834407404 Email: editor@theneutralview.com, letters@theneutralview.com, features@theneutralview.com, feedback@theneutralview.com. For advertisements Contact: 9822111709. Email: advertisements@theneutralview.com

Disclaimer: Except for the editorial above, articles and other text in Yewa Konknaat represent the views of the concerned authors and do not necessarily reflect the views of the Yewa Konknaat Editor, publisher, and/or owners. The advertisements published in Yewa Konknaat are based on information furnished by the advertiser. Yewa Konknaat does not authenticate the printed information in the advertisement. The advertiser will bear all the consequences of issues arising out of the advertisements if any and not Yewa Konknaat.



# 'राधानगरी' एक वनपर्यटन

- टिम "येवा कोकणात"

हिरव्या रंगाच्या नाना छटा, फुलांचे विविध रंग आणि आकार पाहात निसर्गाच्या सान्निध्यात मनसोक्त भटकायचं आहे? मग कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्यात जायलाच हवे. गवा हा इथला बघण्यासारखा प्राणी आहे. राधानगरी अभयारण्याचा समावेश जागतिक वारसास्थळामध्ये करण्यात आला आहे. जगातील ३४ अतिसंवेदनशील ठिकाणांपैकी पश्चिम घाटात राधानगरी अभयारण्य येते.

दक्षिण व उत्तरेकडील पश्चिम घाटाला जोडणारा सह्याद्रीमधील हा महत्वाचा जंगलपट्टा आहे. याचा निमसदाहरित जंगलात समावेश होतो. कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेस असणाऱ्या राधानगरी अभयारण्याचा परिसर ३५१ चौ.कि.मी.चा आहे. याची समुद्रसपाटीपासूनची ऊंची ९०० ते १ हजार फूट असून येथे सरासरी पर्जन्यमान ४०० ते ५०० मि.मी आहे. दाजीपूरचे जंगल हे राधानगरी अभयारण्याचाच एक भाग आहे. कोल्हापूर संस्थानचे महाराष्ट्र राज्यात विलीनीकरण झाल्यानंतर १९५८ ला दाजीपूर जंगलाची दाजीपूर गवा अभयारण्य म्हणून नोंद करण्यात आली. हे महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि पहिले अभयारण्य आहे. राधानगरी आणि काळम्मावाडी धरणाच्या भोवतीच्या जंगल परिसराला १९८५ ला राधानगरी अभयारण्याचा दर्जा देण्यात आला. येथील घनदाट जंगलाचे पट्टे डंग या नावाने ओळखले जातात. येथील डोंगरमाथ्यावर जांभ्या खडकांचे मोठे सडे आहेत. सड्यांवर व सड्यांच्या भोवताली असणाऱ्या दाट जंगलामधील जैवविविधता प्रचंड संपन्न अशी आहे.

निमसदाहरित व पानगळीच्या मिश्र जंगल प्रकारामुळे हे वन असंख्य प्रजातींचे आश्रयस्थान झाले आहे. डोंगरातील दऱ्याखोऱ्यात घनदाट जंगल, विस्तीर्ण सडे आणि गवताळ कुरणात असंख्य प्रजातीचे वृक्ष, वेली, झुडपे, बुरशी आढळून येते. अभयारण्यात १५०० पेक्षा जास्त फुलझाडांच्या प्रजाती आहेत. भारताच्या द्विपकल्पामधील प्रदेशनिष्ठ २०० प्रजाती या भागात असून ३०० पेक्षा जास्त औषधी वनस्पती इथे आहेत. येथे ३६ प्रकारच्या वन्यप्राण्यांची नोंद झालेली आहे. वाघ, बिबळ्या, लहान हरिण, रानकुवा, अस्वल, गवा, सांबर, भेकर, चौसिंगा, रानडुक्कर, साळिंदर, उजमांजर, खवले मांजर, लंगूर याबरोबरच वटवाघळाच्या तीन प्रजातीही येथे आढळतात.

पक्षी निरीक्षणासाठी राधानगरी अभयारण्य अप्रतिम ठिकाण आहे. येथे २३५ प्रकारच्या पक्ष्यांची नोंद झाली आहे. तीन प्रकारची गिधाडे येथे वास्तव्यास आहेत. जगात फक्त पश्चिम घाटात आढळणाऱ्या पक्ष्यांपैकी १० प्रजातींचे पक्षी येथे आढळतात. अभयारण्यातील सांबरकोड, कोकण दर्शन पॉईंट, सावर्दे, काळम्मावाडी धरण, उगवाई देवी मंदिर, ही स्थळे पक्षी निरीक्षणासाठी उत्तम आहेत. १२१ प्रजातींच्या फुलपाखारांची नोंद राधानगरीत झाली आहे. सदर्न बर्डविंग हे भारतातील सर्वात मोठे फुलपाखरू (१९० मी.मी.) असून ग्रास ज्येवेल हे सर्वात लहान फुलपाखरू (१५ मी.मी.) आहे हे दोन्ही फुलपाखरू राधानगरी अभयारण्यात आढळतात. हजारोंच्या संख्येने एकत्र जमून स्थलांतर करणारी ब्ल्यू टायगर, ग्लोसी टायगर, स्ट्राईप टायगर ही फुलपाखरे याठिकाणी ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये येतात.

सरिसृप गटात राधानगरी अभयारण्यात वेगवेगळ्या जातींच्या पाली, सरडे, साप-सुरळी, देवगांडूळ, उभयचर प्राण्यांमध्ये वेगवेगळ्या प्रजातींचे बेडूक आपल्याला इथे भेटतात. पालीच्या नव्या प्रजातीची पहिली नोंद राधानगरीत झाली असून तिचे नामकरण Cnemaspis Kolhapurensis असे करण्यात आले आहे. अभयारण्यात ३३ प्रकारच्या सापांची नोंद आहे. ऑलिव्ह फॉरेस्ट स्नेक, एरिक्स व्हिटेकरी, पाईडबेली शिल्डटेड या सापांची नोंद येथे झाली आहे. गोवा आणि कर्नाटकच्या संरक्षित भागाला लागून असलेले हे अभयारण्य ट्रेकर्सच्या पसंतीचे ठिकाण आहे. दाजीपूरला शासनाचे रिसॉर्ट आहे.

कोल्हापूर सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या सीमेवर राधानगरी तालुक्यामध्ये कोल्हापूरपासून साधारणत: ८० कि.मी. अंतरावर हे अभयारण्य वसले आहे. जवळचे विमानतळ कोल्हापूर आणि बेळगाव आहे तर जवळचे रेल्वेस्टेशन कणकवली आणि कोल्हापूर आहे. कोल्हापूर-राधानगरी-दाजीपूर हे अंतर ८० कि.मी चे असून निपाणी –राधानगरी-दाजीपूर हे अंतर ७० कि.मी.चे आहे. कणकवली- दाजीपूर-राधानगरी हे अंतर ६० कि.मी.चे आहे. दाजीपूर, राधानगरीला भेट दिल्यानंतर जवळ बिसन राष्ट्रीय उद्यान, स्वामी गगनगिरी महाराज मठ, राधानगरी धरण, फोंडा घाट आणि शिवगड किल्लाही आपण पाहू शकतो. महाराष्ट्रातील सर्वात पहिले असलेले हे अभयारण्य अनेक नद्यांनी वेढलेले आहे. भोगावती, दूधगंगा, तुळशी, कळमा, दिर्बा या नद्या अभयारण्यातून वाहतात. नंतर हे सर्व प्रवाह कृष्णेला जाऊन मिळतात. अंजन, जांभूळ, हिरडा, आवळा, पिसा, ऐन, किंजळ, आंबा, कुंभ, कटक, उंबर, गेळा, बिब्बा यासारखे वृक्ष तर कारवी, शिकेकाई, गारंबी, धायटी, मुरूडशेंग, करवंद, बेगाटी, रानमिरी, नरक्या अशा काही वेली आणि झुडुपांसह औषधी वनस्पतींची येथे रेलचेल आहे. अभयारण्याला भेट देण्याचा सर्वोत्तम कालावधी नोव्हेंबर ते मार्च असा आहे. तर मग कधी जाताय राधानगरी अभयारण्य पाहायला ?

## जागतिक वारसा नामशेष होण्याचा धोका:

राधानगरी हे 'युनेस्को'ने जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित केलेले संपूर्ण देशातील अत्यंत महत्त्वाचे आणि जागतिक पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून एक अतिशय संवेदनशील असे अभयारण्य आहे. मात्र, या ठिकाणी हिंडाल्को कंपनीच्या वतीने सुरू असलेली प्रचंड प्रमाणातील बॉक्साईट खोदाई विचारात घेता नजीकच्या काही काळातच हे जागतिक वारसास्थळ नामशेष होण्याचा धोका स्पष्टपणे दिसू लागलेला आहे.येथे वाघ, बिबटे, हरीण, गेळा, सांबर, भेकर, रानडुक्कर, रानकुत्रा, अस्वल, शेकरू, रानमांजर, उदमांजर, ससा, लंगूर असे प्राणी आढळून येतात. याशिवाय गरुड, गिधाड, घार, मोर, पोपट, कबुतर, बदक, पाणकोंबडा, माळढोक, धनेश, रानकोंबडा असे पक्षी आणि फुलपाखरांच्या कित्येक प्रजाती आढळून येतात. अन्यत्र कुठेही न आढळून येणार्या ३०० प्रकारच्या औषधी वनस्पती केवळ याच अभयारण्यामध्ये आढळून येतात. त्यामुळेच सह्याद्री पर्वतरांगा आणि जागतिक पर्यावरणाच्या दृष्टीने या अभयारण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे तर 'युनेस्को'ने या अभयारण्याचा जागतिक वारसास्थळामध्ये समावेश केला आहे. असे असताना शासनाने या अभयारण्याच्या परिसरातील दुर्गमानवाड भागात हिंडाल्को कंपनीला बॉक्साईट खोदाईचा परवाना दिलेला आहे. कंपनीकडून या भागातून दररोज दीड ते दोन हजार टन बॉक्साईटची वाहतूक सुरू आहे. या बॉक्साईटच्या उत्खननासाठी कंपनी अजस्र यंत्रांच्या सहाय्याने या भागातील डोंगरच्या डोंगर भुईसपाट करताना दिसत आहे. बॉक्साईट खोदाईमुळे झालेला 'वनसंहार' भयंकर स्वरूपाचा आहे कंपनीला देण्यात आलेली परवानगी आणखी दोन वर्षासाठी म्हणजे २०२० सालापर्यंतची असली, तरी परवान्याची ही मुदत आणखी काही वर्षे वाढवून मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येते. कंपनीला आणखी काही काळ बॉक्साईट खोदाईची परवानगी दिली, तर अभयारण्याच्या परिसरात काय हाहाकार माजेल, त्याचा अंदाज येण्यास मुळीच हरकत नाही. त्यामुळे हिंडाल्को कंपनीचा येथील बॉक्साईट खोदाईचा परवाना तातडीने रद्द करण्याची गरज आहे. हिंडाल्को कंपनीच्या बॉक्साईट खोदाईमुळे अभयारण्यातील विविध प्रकारची वृक्षसंपदा नष्ट होऊ लागली आहे. यंत्रांच्या आवाजामुळे अभयारण्यातील प्राणी-पक्षी परागंदा होऊ लागले आहेत. जैवविविधता धोक्यात येऊ लागली आहे. मुळात राधानगरी अभयारण्य हे जागतिक जैवविविधतेसाठी जागतिक पातळीवर नावाजलेले ठिकाण आहे. ही जैवविविधताच नामशेष करून साधला जाणारा कोणत्याही प्रकारचा विकास हा कदाचित भविष्यातील विध्वंसाची नांदी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.







# मामाचा गाव मोठा!

सुरेश शामराव ठाकूर

अलीकडे कोकण परिसरात विशेषत: मालवणी मुलखात समुद्रकिनारी उघडलेल्या ब-याच रिसॉर्ट्सना 'मामाचा वाडा', 'माझे आजोळ', 'आजी-आजोबांच्या घरात' अशी आकर्षक नावे दिलेली आहेत! तेथे मालवणी पद्धतीचे लज्जतदार जेवण, कोकणातील आजोळाचे आभास निर्माण करणारी कौलारू घरे, हिरव्यागार शेणाने सारविलेली अंगणे आणि उंच उंच झोपाळे आदी सर्व काही कृत्रिमरित्या सजवलेले असूनही त्याच्यातील तो सहवास, त्या मुलांना आजोळचा आनंद किती देतो? हा तर प्रश्नच आहे! अगदी तीन-चार दिवसाच्या निवासाची महागडी बिले देऊनही तेथील 'आजोळचे दिवस' मुलांच्या अंत:करणात घरही करू शकणार नाहीत आणि आजोळची संकल्पनाही त्यांना पटवून देऊ शकणार नाहीत. पण त्याला त्या बिचा-या पालकांचाही इलाज नाही! अलीकडे मुलांच्या आई-वडिलांप्रमाणे त्यांच्या आजोळचे मामा-मामीदेखील नोकरीला? त्यामुळे प्रश्न असा पडतो की "त्या मुलांना कोण दाखविणार असे 'आजोळचे दिवस' की जे आम्ही उपभोगले आणि 'अत्तराची कुपी, म्हणून अजूनही जपून ठेवलेत,अगदी हृदयाच्या गाभा-यात!

आता एकविसाव्या शतकात पालक आपापल्या लाडक्या मुलांना त्यांच्या त्यांच्या मगदुराप्रमाणे 'मुल मागेल ती वस्तू घेऊन देऊ शकतात! अगदी महागडया इलेक्ट्रॉनिक खेळण्यापासून ते चांगल्या कपंनीच्या उत्तमोत्तम मोबाईलपर्यंत! आणि याला कारणही तसेच, पालकांची वाढत चाललेली 'क्रयशक्ती', दोघा-तिघांचंच मर्यादित कुटुंब! त्यात एकत्र कुटुंब पद्धतीचा, जवळच्या नातेसंबंधाचा अभाव, त्यामुळे वैतागलेल्या लाडक्या मुलांना आजचे पालक अगदी 'अल्लाउद्दीनचा जादूचा दिवा' ही विकत घेऊन देऊ शकतील!

मात्र आजच्या मुलाने जरी हट्टाने मागितले तरी 'आजोळच्या दिवसांचे सुख' हे पालक आपल्या मुलांना कदापिही देऊ शकणार नाहीत! की ज्या आजोळच्या दिवसांचे 'स्वर्गीय सुख' माझ्या पिढीच्या अनेकांनी अनुभवले, अगदी मनमुराद!

तसे माझे आजोळ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यात 'परुळे' गावात! चांगल्या बत्तीस वाडय़ांचा तो मोठा गाव! (आता त्या गावात छोटया छोटया ग्रुप ग्रामपंचायती होऊन तो गाव सात-आठ गावात विभागला गेला आहे) या गावात 'नमस' या वाडीत 'विष्णू सिताराम सामंत' ऊर्फ तातू नमस्कर यांचे घर हेच माझे आजोळ! या नमस वाडीवर इनमीन फक्त पाचच बामणांची घरे! ती देखील सर्व सामंतांचीच! नमसवाडीतील सामंत म्हणून परिसरात त्या सामंतांना 'नमस्कर सामंत' म्हणायचे. 'तातू नमस्कर' हे माझे मोठे मामा. त्या गावातील त्या परिसरातील आणि त्या काळातील एक ख्यातनाम व्यक्तिमत्त्व! अगदी परुळे हायस्कूलच्या जडणघडणीपासून गावात, एस. टी. सुरू करेपर्यंत आणि जिल्ह्याच्या राजकारणापासून स्थानिक सहकारी सोसायटीच्या राजकारणापर्यंत त्याचा सहभाग हा 'सिंहाचाच वाटा' असायचा. त्या काळी परुळे गावातील प्रमुख तीन-चार व्यक्तीत अगदी अग्रक्रमाने घ्यावे असे नाव म्हणजे 'तातू नमस्कर'!

अशा 'दणदणीत आजोळी' आमच्या आजोळच्या सहवासातील दिवस देखील तसेच दणदणीत गेले! माझे वडील गोव्यात म्हापसा येथे शिक्षक म्हणून नोकरीला! आई आणि आम्ही पाच भावंडे आच-यात कायमस्वरूपी वास्तव्यास! इतर कुठेही जाणे-येणे नाही. त्यामुळे दिवाळीची आणि मे महिन्याची सुट्टी कधी पडते आणि कधी एकदा आम्ही आजोळ गाठतो असे आम्हाला व्हायचे. आमच्या सोबत आजोळी येणारी आमच्या मावशींची मुले असायची. वालावलीच्या मावशीचा मुलगा, देवबागच्या मावशीची मुले, मुंबईच्या दोन मावशींची मुले असा सर्व परिवार आमच्या आजोळी जमायचा. अगदी स्नेहमेळा जणू दरवर्षीचाच!!

माझे आजोबा 'कै. विष्णू सिताराम सामंत' यांची मुंबईला पेढी होती. तीही एका गुजराती 'रसिकलाल' नावाच्या व्यापा-यासोबत 'रसिकलाल-विष्णू' या दोघांच्या संयुक्त नावाने त्या पेढीचा कारभार चालायचा म्हणे. पण ते सुख मी काही बघितले नाही, कारण माझ्या आजोळी माझा जन्म आणि माझ्या आजोबांचे निधन एकाच (सुमुहूर्तावर?) झाले. त्यामुळे पूर्वीच्या कथा या सर्व आईकडूनच ऐकलेल्या अगदी सांगोवांगी!

आजोबांच्या मृत्यूनंतर माझा तातामामांकडून तो 'पेढीचा राज्यशकट' काही पुढे चालू शकला नाही. तो त्या व्यापारात कधी रमलाच नाही. नाही म्हणायला त्याने कोणत्या तरी सिने कंपनीत थोडे दिवस सहकारी म्हणून उमेदवारी केली आणि त्याच जोरावर तो आम्हाला सिनेमाच्या, शूटिंगच्या गप्पा सांगायचा. ब्रह्मचारी पिक्र, मा. विनायक, मीनाक्षी यांचा अभिनय आणि 'यमुना जळी खेळ खेळू कन्हया का लाजता' या प्रसंगाच्या शूटिंगच्या कथा रंगवून सांगायचा! या लघुउद्योगानंतर तो गावीच आला.

तेथेच रमला, अगदी अखेपर्यंत! आमचे भाग्य दुसरे काय? तर माझ्या आजोळी माझा तातामामा माझी मामी, त्यांची दोन मुले, माझी विधवा आजी (ती देखील माझ्या आईची सख्खी चुलती) माझे चुलत मामा भाऊमामा (सदानंद सामंत) असा परिवार असायचा! माझे दुसरे एक मामा, भाईमामा (रमाकांत सामंत) हे कायम वास्तव्यास मुंबईत असायचे. त्यांचे त्यावेळी परुळे येथे येणे जरा कमीच. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा सहवास आम्हाला त्यावेळी अल्पच लाभायचा!

देवबागची ताईमावशी आणि तिची मुले, वालावलीची बाईमावशी आणि तिचा मुलगा, मुंबईची लीलामावशी, विमामावशी यांच्याही मुलांचा परिवार कधीकधी मे महिन्यात 'नमस' मुक्कामी आमच्यासोबत असायचा. पण आम्हा आच-याच्या भावंडांचा मुक्काम मात्र त्याकाळी कायम मे महिना आणि दिवाळीच्या सुट्टीत 'नमस' येथे ठरलेलाच!

''आजोळी जाण्यासाठी 'झुकझुक करणारी आणि धुरांच्या रेषा हवेत सोडणारी आगगाडी' काही त्यावेळी नव्हती!

आम्ही चालत चालतच मालवण, तेथून सव्हिस मोटारने देवबाग आणि देवबागच्या ताई मावशीकडे (आप्पा आजगावकर आणि कंपनी) मुक्काम करून होडीने 'नमशीला' जायचो! नमशीला आजोळ आमची वाटच बघत असायचं! अस्सल मालवणी बोलणारा, पण चांदोमामापेक्षाही मनाने शीतल, असा माझा तातामामा, आईपेक्षा कितीतरी पटीने प्रेमळ वाटणारी माझी मामी, चुलत असूनही चुलत अशी कधीही न वाटलेली आणि जिच्या हाताला 'अमृताची पैजा जिंकण्याची चव' होती अशी माझी माई आजी, कमी बोलणारा; पण हृदयापासून प्रेम करणारा आणि अविवाहित राहून आजोळसाठी कष्ट उपसणारा असा माझा भाऊमामा तसेच मोठया मामाची दोन मुले, दादा आणि नयन.





## मामाचा गाव मोठा!

या सहा माणसांच्या बारा डोळयातून आमचे आजोळ जणू आमची वाट बघत आहे असेच आम्हाला वाटायचे.

आजोळी आमच्या छोटया कंपनीचाच मुक्काम असायचा. घरची वडील माणसे आम्हाला आजोळी सोडून आपापल्या घरी परतायची. त्याकाळी नमशीला जमणा-या दहा-पंधरा मुलांच्या दंग्याला माझे आजोळ कधी कंटाळले नाही. मामीची माया, तातामामा आणि भाऊमामांचा आवश्यक असेल तेव्हा धाक, माईआजीच्या सूचक सूचना आणि अगदी चोवीस तास 'खाव जाव घर तुम्हारा' असे मोकळे वातावरण! त्यामुळे आजोळचे वास्तव्य आम्हाला अधिकच स्वर्गीय वाटायचे.

चालत-चालत, सव्हिस मोटारीने, होडीतून असा तिहेरी प्रवास करून आम्ही संध्याकाळी आजोळी पोहोचायचो. हात-पाय धुऊन सगळी चौकशी झाल्यावर, सगळय़ांचे सामूहिक स्नान खालच्या विहिरीवर व्हायचे! माझ्या मामाचे घर मोठे चौसोपी होते!

अगदी 'वाडा चिरेबंदी' टाईप! आजोबांनीच ते बांधले होते. दोन्ही मामांनी नारळाची बाग आणि गावचा शेती व्यवसाय करून त्यात भर घातली. घराच्या खालच्या परडयात माडाचे बन आणि तेथेच आमची आंघोळीची विहीर! बाजूलाच पाण्याने भरलेली डोणी! अगदी चिरेबंदी आणि ऐस-पैस बांधलेली! तीच आमची सर्वांची आंघोळीची डोणी!

त्या विहिरीजवळ तातामामा सगळय़ांच्या डोक्यावर हातलाठीने दोन-दोन कोळंबी पाणी घालून आमची 'सामूहिक आंघोळ' उरकायचा. त्यानंतर कसेबसे अंग पुसून, दंगा मस्ती करत आम्ही वरच्या पडवीत यायचो. तेथे मामी आमची वाटच बघत असायची. ती आमची ओली डोकी पुन्हा सुक्या टॉवेलने खसखशीत पुसून काढायची.

प्रवासात कुठे पायाला जखम झाली असेल तर 'पंडित रंजन' नावाचे मलम लावायची. त्या मलमाने आमच्या सर्व वेदना दूर व्हायच्या. त्या मलमात काय गुण होता हे मला ठाऊक नाही. पण मामीच्या बोटांचा प्रेमळ स्पर्श आमचा शिणवा दूर घालवायचा! त्या काळी 'पंडित रंजन' नावाचे मलम माझ्या आजोळी 'रोग अनेक उपाय एक' या उक्तीप्रमाणे सर्वच वेदनांवरती वापरले जायचे. मी मोठा झाल्यावर त्याची सर्व केमिस्ट आणि ड्रगिस्टकडे चौकशी केली, पण मला ते कुठेच आढळले नाही.

मामी आमची डोकी पुसते न पुसते तोपर्यंत माईआजीने माजघरात हापूस आंब्याची रास कापून घातलेली असायची. त्यांचे वाटे केलेले असायचे, आंब्यांना तोटा नसायचा, मात्र अधाशासारखे खात-खात आम्हीच दमून जायचो. ती गिरण चालू असतानाच तातामामा, माईआजी, मामी, भाऊमामा मध्ये मध्ये प्रश्न विचारून आमच्या घरची खुशाली घ्यायचे. "बाया कसा आसा?" आप्पा काय म्हणतत? नवीन घेतलेली म्हैस दूध देता काय?" आदी एक ना अनेक! भल्या मोठया आडाळयावर कापून फोडीत रूपांतरीत होणारे रसरशीत हापूस आंबे आणि आमचा चालू असलेला गिरणीचा पट्टा यात त्यांचे ते 'खुशालीचे प्रश्न' आम्हाला नकोसेच वाटायचे! दादा व नयन ही मामे भावंडे आणि आम्ही सर्वांच्या दंगामस्तीला जी त्यावेळेपासून सुरुवात व्हायची ती महिन्याभरानंतर पुन्हा घरी येण्याच्या आदल्या दिवसापर्यंत चालू असायची.

तिन्ही सांज होताच सर्वांचीच एकत्र पर्वजा व्हायची! माझ्या आजोळी तबला, पेटी, झांज आदी संगीताचे साहित्य होते. मामा सगळय़ांना घेऊन भजनाला बसायचा. आज भाचवंडे आल्यामुळे तो भजनात जास्तच रंग भरायचा. सप्तसूर लावून आणि नाकातून वेगळा आवाज काढत भजन सुरू करायचा. 'वसुदे वसुतं देवं'पासून सुरू झालेले त्याचे भजन फारच लांबायचे. आमचे सारे लक्ष मात्र भजनापेक्षा मामीने नैवेद्याला ठेवलेले काजूगर, कापेगरे आणि सुके खोबरे यांच्याकडेच जास्त असायचे.

जेवणानंतर पत्त्यांचा डाव रंगायचा. मामा सगळय़ांना घेऊन आमच्या सोबत 'झब्बू' खेळायचा! मी पत्त्याच्या पानांची सहज अदलाबदल करत असे म्हणून माझ्यावर बारीक लक्ष ठेवायचा. एवढा मोठा आमचा तालेवार, तातामामा, आम्हा छोटया भाचवंडांसोबत झब्बू खेळतो आहे हे दृश्यही साठ वर्षापूर्वी अगदी फोटो काढून ठेवण्यासारखे असायचे;पण त्याकाळी आमच्याकडे कॅमेराच नव्हता. कॅमेरा असला असता तर ते फोटोही आज खराब झाले असते. पण 'मनाच्या कॅमे-यात बंद केलेले ते दृश्य' आम्हा भाचवंडांच्या हृदयात अजूनही चिरंतन आहे. लाईफ लॉंग!

पत्त्यांचा डाव झाल्यानंतर जेवणे व्हायची. स्वयंपाकाचा आणि रणरणत्या चुलीचा ताबा माझ्या आजोळी माईआजीकडेच होता. तिच्या हाताला सुगरणीची चव होती. तिने केलेली 'सुळयाची आमटी', 'कालवाचे झणझणीत', 'मुळयाची एकशिपी' आदी पदार्थांची आठवण झाली तरी आजही तोंडाला पाणी सुटते! अशा माईआजीच्या झणझणीत जेवणावर ताव मारल्यावर आम्हा समस्त मामे-मावस भाचवंडांच्या पोटाच्या टिमकीच्या स्पर्धा लागायच्या! कुणाची पोटाची टिमकी जास्त वर आली, यात आम्ही भाव खायचो. "पेटून जेवणे अन् रेटून ते खाऽऽणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे." असे काही व्हायचे.

रात्री मालवणी नटसम्राट 'मच्छिंद्र कांबळीच्या' मालवणी बोलीलाही लाजवेल असे आमच्या तातामामाचे लाजवाब 'मालवणी कथाकथन' ते ऐकत ऐकत मामीने घातलेल्या अंथरुणावर आम्ही भाचवंडे झोपी जायचो. आमच्या अंगावर घातलेल्या त्या रजईला, त्या गोधडीला चांगली उब असायची. कारण त्या सर्व गोधडया उत्कृष्ट हाती कटिंग करून फुलांपक्षांचे आकार देऊन 'टाकाऊतून टिकाऊ' कसे करता येतील याची सगळी काळजी घेऊनच मामीने शिवलेल्या असायच्या! म्हणून त्या गोधडीला आगळीच उब असायची. रात्री त्या गोधडया डोक्यावर घेऊन आम्ही गोधडीच्या आत जागे राहून कुजबुजत असू 'आता झोपलात नाय तर एकेकाच्या ढुंगणांवर ख्वाट लाऊची लागतली माका' या तातामामाच्या धमकीने समईच्या अंधरात आम्ही लगेच चिडीचूप होऊन झोपी जायचो.

सकाळी उशिरा तातामामाच्या ओरडण्यानेच आम्हाला जाग यायची. "आता उठतास का घालू एकेकाच्या ढुंगणावर लाथ, नव वाजान गेले." या तातामामाच्या धमकीवजा मालवणी (सुमधुर) भूपाळीने आम्हाला जाग यायची. नंतर भाकरीला लावलेले घरगुती गाईचे रवाळ तूप, कधी कधी चून मसाला भाकरी असा चहा-भाकरीचा फक्कड नाष्टा व्हायचा. त्यानंतर ताता मामांसोबत परडयात काजू वेचणे, आंबे काढणे, नारळ गोळा करणे आदी आमचे उद्योग! ते त्यांना नकोसे वाटत असत, कारण आमच्या आजोळी कामालाच दहा पंधरा गडी माणसे कायमचीच असल्याने आमचे त्यात लुडबुडणे ही तशी त्यांना अडचणच व्हायची. पण आमच्या दोन्ही मामांची त्याबाबत कधीच तक्रार नसायची. दुपारी कर्लीच्या नदीत यथेच्छ डुंबणे, होडया चालविणे, कधी कधी कालवे, मुळे काढणे, त्यानंतर आंघोळ, पुन्हा आंब्यांचा फडशा, पुन्हा मामीचे पायाला मलम लावणे त्यांनतर मस्तपैकी लोणचे आणि आंबाडयाबरोबर उकडया पेजेवर येथेच्छ ताव. अन् पुन्हा टिमकी स्पर्धा! पुन्हा पत्त्याचे डाव! त्या मोठया वाडावजा घरात दिवसाढवळया आमचा दडाकूकू (लपाछपी) चालायचा. आमच्या आजोळी ज्या खोलीत आम्हा सर्व मामे-मावस अशा भावंडांचा जन्म झाला अशी एक काळोखाची खोली होती की जिला फक्त एकच छोटी खिडकी होती! ही आमची लपण्याची खास जागा असायची.

दंगा जर जास्तच झाला तर ताता मामा ओरडायचा. पण त्याचे ओरडणे ओठातून जास्त पोटातून कमी असायचे. कधी-कधी संध्याकाळी मामी आम्हाला जवळच्या देवळात असलेले मणेरीकरांचे किंवा अन्य बुवांचे सुश्राव्य कीर्तन किंवा पार्सेकर, कलेश्वरकर या दशावतारी मंडळाचे दहीकाले, देवबागला होणारी मच्छीमार मंडळाची नाटके आदी बघायला घेऊन जायची. माझ्या मामीला आधुनिकतेची ओढ त्याकाळी पुष्कळ होती. मला सर्व जण घरी 'बंडू' या टोपण नावाने संबोधित असत, असे असले तरीही माझी मामी मला 'सुरेश' म्हणायची! त्याचंच मला त्याकाळी फार अप्रूप वाटायचं. आणि म्हणूनच माझी मामी मला जास्त जवळची वाटायची.

मामीला तिच्या माहेरचे अगदी जवळचे असे कोणीही नव्हते. ती आपल्या मुलांवर जशी आणि जेवढी माया करायची, तेवढीच निरपेक्ष माया आम्हा भाचवंडांवर करायची! ती जिजाबाईसारखे आडवे कुंकू लावायची. तिची ती 'चिरी' तिच्या रूपवान चेह-यावर अधिकच खुलून दिसायची. आम्हा साऱ्यांचे कपडे स्वच्छ धुणे, फाटलेले कपडे 'रफू' करणे, त्यांना गादीखाली घालून परिटघडी करणे आदी कामे मामी अगदी सहजतेने करायची. आज माझा तातामामा, माझी मामी, माईआजी ही माणसे हयात नाहीत. ती हे जग सोडून केव्हाच दूरच्या प्रवासाला निघून गेली, परंतु त्यांनी दिलेल्या मायेने अजूनही डोळे पाणावून जातात. देवाने न मागता हे आम्हाला सारे दिलेले होते!

आज माझ्या आजोळी असलेले भाऊमामा, माझे मामेभाऊ (दादा नमस्कर) त्यांची पत्नी (रतन वहिनी) व मुले शिल्पा, प्रशांत आणि प्रिती या सर्वांनाही या आजोळचा ओढीचा धागा अजूनही चिरंतन ठेवला आहे. आमच्या आजोळी मामांची शेतीची ठिकाणे वेगवेगळया भागात (बानाची वाडी, शिरडी, झरकुंबळ, कर्ली, तिनमाड, पाचमाड आदी) आम्ही तेथे गेल्यावर त्या-त्या ठिकाणात ब्राह्मण भोजने व्हायची. व्यक्तीश: माझ्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत माझ्या आजोळचा, विशेषत: माझ्या तातामामाचा वाटा फार मोलाचा आणि महत्त्वाचा आहे.

आंब्यावर ताव मारणे, लपाछपी खेळणे, भेंडया लावणे, नदीत डुंबणे मामाबरोबर चुडीच्या प्रकाशात कर्ली नदीत कुल्या-मासे पकडणे, काजू, आंबे गोळा करणे, होडी चालविणे आदी आनंदात रंगलेल्या आमच्या बालपणीचा 'मे' महिना मृगाच्या चाहुलीने सात जूनला संपायचा! जड पावलांनी आम्ही सर्व आपआपल्या घरी परतायचो, पुन्हा पुढील येणा-या मे महिन्याची वाट पाहत आणि आजोळी केलेल्या गमती-जमती आठवत आणि मनात साठवत!

आज आमच्या तातामामाची सर्वच भाचवंडे पुरेपूर 'ज्येष्ठ नागरिक' झालेली आहेत. सर्वांचीच 'साठी' केव्हाच उलटून गेली आहे. मी देखील अलीकडेच एकसष्ट वर्षातून बासष्ठव्या वर्षात पदार्पण केले. अजूनही कधीकधी एकांतात असताना आजोळच्या आठवणींची तंद्री लागते. डोळे मिटतात, मन आजोळच्या उपभोगलेल्या स्वप्नरंजनात गुंग होऊन जाते आणि अचानक तातामामाचे ते शब्द कानी येतात.

"अरे नव वाजान गेले, उठलास नाय तर एकेकाच्या ढुंगणावर ख्वाट मारतलंय" आणि त्या धक्क्याने मी पुन्हा दुर्दैवाने वर्तमानात येतो! डोळे ओलावतात. डोके जड होते. आणि कंठाशी आठवणींचा हुंदका दाटून येतो. तो काही काळ तेथेच थांबतो!

असे होते आमचे आजोळचे दिवस..! साक्षात देवबाप्पालाही हेवा वाटावा असे.. रम्य ते स्वर्गीय!

# महिला सक्षमीकरणासाठी शेती हाच पर्याय

- पूजा खानविलकर (महिला किसान), कोरले,ता. देवगड













महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून महिला किसान सशक्तीकरण परियोजना उपजीविका अंतर्गत महिला किसान अभ्यास दौऱ्याला जाण्याचा योग आला आणि शेतीविषयक कल्पनाच बदलून गेल्या. आमच्या कोकणातील शेतीतही पैसा पिकू शकतो याची जाणीव झाली. कमी खर्चिक असलेली सेंद्रिय शेती करतानाच, त्यातून चांगला नफा मिळवणारे फार्म पाहताना, आमच्याकडे आहे मात्र त्याचा योग्य वापर आणि नियोजन केले जात नसल्याचे लक्षात आले. ७ जानेवारी ते १० जानेवारी २०१८ दरम्यान हा दौरा होता. कोल्हापूर येथील कणेरी मठ, बारामती येथील कृषी विज्ञान केंद्र आणि पुणे हिंजवडी येथील अभिनव फार्मर क्लबचा शाश्वत शेतीचा प्रयोग पाहणे हि या दौऱ्यातील प्रमुख ठिकाणे होती. सोबतीला होते महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे अधिकारी शिवाजी खरात (जिल्हा व्यवस्थापक उपजीविका ), प्रभाकर गावडे ( जिल्हा व्यवस्थापक क्षमता बांधणी) या दोन प्रमुख अधिकाऱ्यांसोबत देवगड तालुक्यातील प्रभाग समन्वयक शरद थोरावत, कुडाळ तालुक्यातील ओरसच्या प्रभाग समन्वयक तेजस्विनी कांबळी, सावंतवाडीच्या प्रभाग समन्वयक ममता रेडकर आणि महिला भगिनी मिळून एकूण ८१ लोकांचा समूह. सोबतच्या अधिकाऱ्यांकडून मिळणारी माहिती समजून घेताना आणि प्रत्यक्षातील शेती क्षेत्रात तिथल्या लोकांनी साधलेला विकास पाहता महिलांच्या सक्षमीकरणासाठी शेती हाच उत्तम उपाय असल्याचे मनाला पटू लागले होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून महिला भगिनी ७ जानेवारीला सकाळी तालुक्याच्या ठिकाणी जमल्या आणि दोन एस.टी बसणे हि अभ्यास दिंडी शाश्वत शेती विकासाच्या शोधात निघाली. या दिंडीचे पहिले ठिकाण होते कोल्हापूर येथील कणेरी मठ. साधू, संत यांचे मठ आपल्याला माहित आहेत, हा देखील एका महान व्यक्तीने स्थापन केलेला मठ मात्र येथे शाश्वत शेती शास्त्राचे धडे दिले जातात.येथे सिध्दगिरी म्युझियम पाहण्यासारखे आहे. कोल्हापूरपासून साधारणत: १२ किलोमीटरवर हे म्युझियम उभारण्यात आले आहे. शहरीकरणामध्ये लुप्त होऊ पाहात असलेल्या ग्रामीण जीवनशैलीचा एक नमुनाच इथे पाहायला मिळतो. इथे पोहोचल्यानंतर तुमच्या स्वागतासाठी सज्ज असतात ती मेष, सिंह, कन्या अशी बारा राशींची शिल्पे त्यानंतर एका गुहेसदृश्य भागातून आत जाताच प्राचीन काळात भारतामध्ये होऊन गेलेल्या ऋषी मुनींचे पुतळे इथे उभारण्यात आल्याचे दिसतात. प्रत्येक ऋषीचे नाव, त्यांची विद्या, त्यांचे योगदान यासह आवश्यक ती तसेच सर्वसामान्यांना माहित नसलेली माहितीही या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या गुहेतून बाहेर पडताच दोन्ही बाजूला समोर दिसतं ते हिरवागार शेत आणि या शेतात काम करणारी माणसं. इथूनच सुरू होतो तो खरा ग्रामीण जीवनशैलीचा प्रवास. हळू हळू या माणसांच्या जवळ जाताच आपल्या लक्षात येतं की, ही माणसं नसून माणसांच्या हुबेहूब प्रतिकृती आहेत. धान्याची पेरणी करण्यापासून ते धान्य घरात येईपर्यंतची प्रत्येक प्रक्रिया या प्रतिकृतींमधून दाखविण्यात आली आहे. याचसोबत शेतांमध्ये बैल, गाय, म्हशी या जनावरांचा असणारा वावर, लगोर, लंगडी, सूर पारंब्या हे खेळ यांचे प्रत्यक्ष दर्शन घडविणाऱ्या या प्रतिकृती जीवंत वाटाव्यात इतके बारकावे यामध्ये टिपले आहेत. शेती आणि शेतकऱ्याचे काम याची ओळख करुन देणारा असा हा या म्युझियममधील भाग आहे.

▶





◀

बारा बलुतेदार ही समाजव्यवस्था आजही अनेक खेड्यांमध्ये पाहायला मिळते. या व्यवस्थेनुसार आज फारसे काम चालत नसले तरी ही बलुतेदारी म्हणजे काय आणि त्यावर चालणारा उदरनिर्वाह याची ओळख करुन देणारी शिल्पे इथे पाहायला मिळतात. चांभार, लोहार, न्हावी, कोष्टी, कुंभार, शिंपी, सोनार यासह वासुदेव, पिंगळा यांची शिल्पेही त्या त्या जीवनशैलीचे दर्शन घडवितात. ग्रामीण भागात असणाऱ्या विविध घरांचे सुंदर नमुनेही इथे पाहायला मिळतात. वतनदाराचा वाडा, पाटलाचा वाडा, शिंप्याचे घर यांच्या हुबेहुब प्रतिकृती इथे तयार करण्यात आल्या आहेत. इथल्या काडसिध्देश्वर महाराजांच्या मठात प्रवेश करताच मनाला एका अनामिक अशी शांतता लाभते.

शेतीमधील विविध प्रयोग पाहतानाच, देशी गाईंचे पालन करून निर्माण केले जाणारे सेंद्रिय खत, पालापाचोळा एकत्र करून केली जाणारी खात निर्मिती, आयुर्वेदाच महत्व सांगणार हॉस्पिटल, गुरुकुल पद्धतीची शाळा सार काही पुन्हा ग्रामीण परंतु आरोग्यदाई जीवनशैलीकडे घेऊन जाणारे येथील चित्र खरच आपल्या देशातील ग्रामीण लोकजीवन समृद्ध करणारे आहे. त्याचे अनुकरण केले पाहिजे. कणेरी मठातील दिवस कसा गेलं ते समजलच नाही. येथील ग्रामीण जीवनशैलीचा प्रवास पुन्हा एकदा कोकणच्या गतकाळात घेऊन जात असतांना बारामतीच्या दिशेने बस निघाल्या रात्री आराम करून कृषी विज्ञान केंद्रातील आधुनिक शेती विकासाच्या अभ्यासाला.

दुसरा ८ जानेवारीचा दिवस उजाडला बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रातील शेतकरी निवासात. चहा, नाष्टा झाला आणि शेतकरी निवासाच्या मोकळ्या जागेत महिला भगिनींची मैफल जमली आणि सुरु झाला ओळखीचा कार्यक्रम. आधीच सगळ्यांची मैत्री झाली होती, ओळखीने आणखीन मजबूत झाली. अभियानाचे गीत गात आम्ही निघालो कृषी विज्ञान केंद्र पहायला. लोकनेते शरद पवार यांच्या संकल्पनेतून हे केंद्र उभ राहील आहे. देशात काही दशकांपुर्वी शेतीत यात्रीकीकरण आले. आधुनिक खते, बियाणे यांचा वापर होऊ लागला आणि शेतीची उत्पादकता वाढीस लागली. ठिबक सिंचनामुळे पाण्याचा कमीत कमी वापर करून शेत मळे बहरायला लागले. शेतीपूरक व्यवसायांनी शेतीला जोडधंदा मिळवून दिला. शेळी पालन, विविध जातीच्या गाईंचे पालन, शोभिवंत मासे निर्मिती, मधुमक्षिका पालन, कुक्कुट पालन, वराह पालन असे विविध प्रकार शेतीला पूरक ठरू लागले. अत्यंत शास्त्रीय पद्धतीने हे सारे शेतीपूरक व्यवसाय कसे करावेत याचे अवलोकन अत्यंत जवळून बारामतीच्या या केंद्रात करता येते. आधुनिक अवजारे, उस लागवड, झेंडू लागवड, संत्रा लागवड, माडाच्या विविध जातींची लागवड, चिकू बाग, पपई बाग, केळींची लागवड, पेरू लागवड हि आणि यासारखी अनेक पिके कशी घ्यायची याची शस्त्रोक्त पद्धत बारामतीच्या या केंद्रात पहायला मिळते. येथील नर्सरीत विविध झाडांची रोपे अत्यंत दर्जेदार पद्धतीने बनविली जातात. बागायतीमधील आंतरपिके, कोणत्या बागेत कोणते पिक घ्यायचे याचा अभ्यास येथे करता आला. झेंडू सारख्या फुलांच्या लागवडीबरोबर पॉलीहाउस मधील फुल शेती अभ्यासता आली. परसातील शेती हा कोकणातील एक प्रकार आहे मात्र परस बागेत अत्यंत नियोजनबद्ध विवध भाज्यांचे उत्पन्न कसे घेता येते ते इथेच शिकावे.

महिला भगिनींचा दौरा म्हटल्यावर देव दर्शन होणारच. बारामतीतून संध्याकाळी परतीच्या प्रवासाला निघताना मोरगावच्या मोरेश्वराचे दर्शन करून जेजुरीच्या खंडोबा दरबारी दाखल झालो. गडावरचा तो गार वारा अंगाला झोंबत होता. त्यात खंडोबाची महती मन भारावून टाकत होती. येथील भंडारा डोकीला फासून रात्री आळंदीचा मार्ग धरला आणि वेध लागले ज्ञानेश्वर माऊलीच्या दर्शनाचे. ९ जानेवारीची पहाट होताच आवराआवर करून समाधिस्थळाकडे सर्वांची पावले वळू लागली, माऊलींचे दर्शन झाले. पुढे भेटणार होत्या शेतीच अभिनव दान महाराष्ट्राच्या पदरात टाकणाऱ्या आजच्या काळातील माऊली ज्ञानेश्वर बोडके. पुणेतील हिंजवडी लगतच्या माण गावात बोडके कुटुंबाचा फार्म आहे. या कुटुंबाने शेतीत केलेले प्रयोग निश्चितच नव्या वाटेवर घेवून जाणारे आहेत. बोडके यांनी स्वतःबरोबर अनेकांना पुढे नेल आहे. सेंद्रिय शेती काळाची गरज आहे हे त्यांनी पटवून देतानाच त्यातून मिळणाऱ्या आर्थिक नफ्याची जाणीवही लोकांना करून दिली आहे. माऊलीचं हे दान घेवून आम्ही परतीच्या प्रवासात निघालो, पुन्हा सिंधुदुर्गात. मागे फिरताना मग आठवू लागली ती आमची शेती आणि त्यासोबतच स्वताच आरोग्य.

आमच्या कोकणात असंतुलित पद्धतीने शेतीचा उपयोग केला जातो. कोकणच्या आवश्यकतेनुसार पिकांचे उत्पादन केले जात नाही. पोटापुरतेच पीक घेतले जाते. सर्रास शेतकरी वर्ग शेतीपेक्षा चाकरमान्यांच्या मनिऑर्डरवर अधिक लक्ष देतो. त्यात सध्याच्या बँकिंग पद्धतीमुळे हे काम अगदी सोपे झाले आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशातील लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती असल्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे कृषी अर्थशास्त्रात सांगितले आहे. मात्र आम्ही शेतीपासून दूर निघालो आहोत. दुसरीकडे स्वतःबरोबर जमिनीच्या आरोग्याकडे आम्ही दुर्लक्ष करत आहोत. मनुष्याच्या स्वत:च्या आरोग्याला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व जमिनीच्या कसाला आहे. शेतकरी वर्ग प्रथम चांगल्या प्रतीची जमीन, मध्यम प्रतीची जमीन नंतर नापीक जमीन लागवडीखाली आणीत असतो. अलीकडील काळात जमिनीच्या कसाकडे कोकणातील शेतक-यांचे दुर्लक्ष होत असल्याचे आढळून येत आहे. कारण अजूनही शेती ही निसर्गावर अर्थात पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे उत्पादनामध्ये अनिश्चितपणा असतो. शेत जमिनीची उत्पादकता अनेक कारणांमुळे कमी होत आहे. त्याला अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यात शेतीसाठी जमिनीचा अतिवापर करणे, बदलत्या परिस्थितीमुळे सेंद्रीय खतांकडे दुर्लक्ष करणे, माहितीच्या अभावामुळे रासायनिक खतांचा असंतुलित वापर, पाण्याचा अयोग्य वापर, आणि जमिनीची होणारी धूप न थांबविणे अशा अनेक कारणामुळे जमिनीचा 'कस' कमी होत चालला आहे. त्यामुळे जमिनीची पत बिघडत चालली आहे. म्हणून शेतकरी राजाला जमिनीच्या पतीविषयी माहिती असणे आवश्यक आहे. आज देशातील उद्योगांचा विचार करता, शेती क्षेत्रामध्ये गुंतवणूक कमी आहे. सध्या जमिनीच्या वापराचा अभ्यास केल्यानंतर असे निदर्शनास आले की, जमिनीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे जमिनी नापिक झाल्यानंतर शेतक-यांचे लक्ष जाते. तोपर्यंत जमीन ही अनुउत्पादक झालेली असते.शेतीक्षेत्र हे देशातील सर्वात जास्त रोजगार निर्मितीचे प्रमुख क्षेत्र आहे. शेतीची उत्पादकता कमी होत असल्यामुळे शेतक-यांची आर्थिक परिस्थिती ढासळली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करू लागले. जमिनीचा कस वाढवून उत्पादन वाढविण्याच्या शेतकरी प्रयत्न करीत असतो आणि वाढत्या उत्पन्नाचा फायदा शेतक-यांना होतो. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची मागणी वाढत असते. मात्र त्याप्रमाणे पुरवठा केला जात नाही. त्याचे एकमेव कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येबरोबर कमी होत जाणारे शेती उत्पादन होय. हे लक्षात घेता अभिनव फार्मर क्लबने शेतीचे जे तंत्र विक्षित केले आहे त्या पद्धतीने शेती केल्यास कोकणातील शेतकरी सधन होऊ शकतो. तसेच तो भविष्यातील पिढीला आरोग्यदाई खाद्य देऊ शकतो.

शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी शेतकरी रासायनिक खतांचा वापर मोठया प्रमाणावर करताना दिसून येतात. परंतु काही पिकांची उत्पादनवाढ तात्पुरत्या स्वरुपाची किंवा काही काळासाठीच असते. याचे कारण असे की, आपण उत्पादनवाढीसाठी पिकाला रासायनिक खतांची गरजेपेक्षा अधिक मात्रा देतो. परिणामी जर रासायनिक खतांना अधिक व सातत्याने वापर केल्यामुळे जमिनीचा पोत बिघडतो. परिणामी जमिनीची उत्पादनक्षमता कमी होते. खतांचा वापर अधिक करावयाचा झाल्यास पिकांना पाणीही मोठयाप्रमाणावर द्यावे लागते. त्यामुळे साहजिकच क्षारांचे प्रमाण वाढते; जमिनी खार वाटतात. रासायनिक खतांच्या अति वापरणे शेतातल्या जमिनीमध्ये असणार्या. गांडुळांची संख्या कमी होते. कारण रासायनिक खत गांडूळाला मानवत नाही. गांडूळ कमी झाले की, शेतातल्या मातीमध्ये असणारे कृमी, कीटक आणि रोगजंतू हे मोकाट सुटतात. कारण त्यांचा फडशा उडविणारे गांडूळ कमी झालेले असतात. त्यामुळे रासायनिक खत जितका जास्त वापरू तितके पिकांवर रोग जास्त पडायला लागतात. ज्या शेतात रासायनिक खतांचा मारा केला जातो त्या शेतातल्या पिकांवर रोगही जास्त पडतात. म्हणजे रासायनिक खतांमुळे आधी खतांचा खर्च वाढतो आणि नंतर औषधांचे खर्चही त्या पाठोपाठ वाढायला लागतात. शेतांमधल्या पिकांवर औषधांचा मारा जास्त केला की, शेतातली पिके विषारी व्हायला लागतात. औषधे मारल्यामुळे अळ्या आणि लहानसहान कीडी मरतात हे खरे, परंतु अशा प्रकारे मरून पडलेल्या अळ्या किंवा किड्यांना खाण्यासाठी चिमण्या किंवा अन्य काही पक्षी शेतामध्ये यायला लागतात आणि अशा अळ्यांना खायला लागतात तेव्हा त्या अळ्या खाणारे पक्षी सुद्धा मरण पावतात. कारण त्या अळ्यांच्या माध्यमातून त्यांच्यावर मारलेले औषध पक्ष्यांच्या पोटात जात असते. पक्ष्यांना सुद्धा बुद्धी असतेच. शेतातल्या अळ्या खाल्ल्यामुळे पक्षी मरत आहेत हे त्यांच्या लक्षात येते आणि ते पक्षी पुन्हा शेताकडे फिरकत नाहीत. हे पक्षी शेतामध्ये येत राहणे त्यांनी शेतातल्या अळ्या, कीडी खाणे आणि जाताना शेतात विष्ठा टाकून जाणे या गोष्टी शेतीतले नैसर्गिक चक्र फिरत राहण्यासाठी आवश्यक असते. परंतु हे पक्षी शेताकडे फिरकेनसे झाले की हे चक्र तुटते आणि शेताला आयतेच मिळणारे हे खत मिळेनासे होते आणि शेतातल्या किड्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वारंवार औषधेच वापरावी लागतात. त्याचा परिणाम होऊन शेतातला खर्च वाढतो, पिके विषारी होतात आणि परिणामी पिकांचा दर्जाही घसरतो. आज शेतीमध्ये रासायनिक खते, कीटकनाशके व तृणनाशके इत्यादींचा वापर कमी करून अन्नधान्याचा दर्जा व अन्न सुरक्षा वाढविणे आणि त्याच वेळी उत्पादन खर्चही कमी करणे. अशा दुहेरी दृष्टिकोनातून सेंद्रीय शेतीला उत्तेजन दिले जात आहे. अभिनव फार्मर क्लबनेही तेच काम हातात घेतले आहे. हेच मॉडेल कोकणात राबवणे शक्य आहे यातून ग्रामीण भागातील शेतकऱ्याला रोजगार मिळेल शिवाय नोकरीसाठी मुंबईकडे जाण्याची गरज उरणार नाही. तेव्हा आम्ही निश्चय केलाय, तुम्हीही करा, सर्वांनी मिळून सेंद्रिय शेती करू आणि आपल्याबरोबर सर्वांचे पर्यायाने देशाचे आरोग्य सुधृढ घडवू. या सहलीतून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सिंधुदुर्ग विभागाने आम्हाला शेतीकडे नव्याने पाहण्याची जाणीव करून दिली त्याकरता त्यांचे खूप खूप आभार.......

( लेखक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानात कोर्ले ता. देवगड येथे सीआरपी म्हणून काम करतात)

# अखेर जंजि-यावर तिरंगा फडकला

६९ वर्षांपूर्वी आजच्या दिवशी चारशे वर्षांचा इतिहास लाभलेल्या मुरुडच्या जंजिरा किल्ल्यावर तिरंगा फडकला. जंजिरा संस्थानात स्वातंत्र्याचा सूर्य उगवला. हा दिवस तसा एका डोळ्यात हसू आणि दुसऱ्या डोळ्यात आसू अशाप्रकारचा होता, कारण त्याच्या आदल्या दिवशी ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधी यांची हत्या झाली होती. पण दुसर्या दिवशी म्हणजे ३१ जानेवारी या दिवशी जंजिरा संस्थानाच्या पारतंत्र्यातून कुलाबा जिल्ह्यातील मुरुड, म्हसळा आणि श्रीवर्धन या तीन तालुक्यांनी स्वातंत्र्याचा श्वास घेतला. कारण देश ब्रिटीशांच्या जोखडातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी मोकळा झाला असला तरी ब्रिटिशांचे मांडलिक असलेल्या सिद्दी नबाबाच्या जंजिरा संस्थानाच्या पारतंत्र्यातून मुरुड, म्हसळा, श्रीवर्धन हे तीन तालुके मुक्त झाले नव्हते, ते देशाच्या स्वातंत्र्यानंतर तब्बल साडे पाच महिन्यांनी महाडच्या क्रांतीवीर नानासाहेब पुरोहितांनी घडविलेल्या जनआंदोलनाने ३१ जानेवारी १९४८ ला मुक्त झाले आणि येथील स्वातंत्र्यप्रिय जनतेसाठी आनंदाची पहाट उगवली. जंजिरा अजिंक्य असल्याचा तोरा या क्रांतीने धुळीस मिळाला.

रायगड जिल्ह्याच्या मातीत स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर जे जे लढे झाले, ते इतिहासाच्या पुस्तकात सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगे आहेत, पण दुर्दैवाने हे काम नेटकेपणाने झाले नाही आणि सत्तेच्या संगीत खुर्चीत रममाण झालेल्या महाराष्ट्रातील विविध राज्यसरकारांना या लढ्यांचे गांभीर्य लक्षात घ्यावेसे वाटले नाही. तसे नसते तर सरकारने जंजिरा संस्थानच्या १९४८ च्या स्वयंस्फूर्त स्वातंत्र्यलढ्याची नोंद घेतली असती आणि या लढ्यात सहभागी झालेल्या स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान केला असता. संपूर्ण देशात जनतेने उठाव करुन विलिनीकरण झालेले जंजिरा-मुरुड हे एकमेव संस्थान आहे. या संस्थानचा नबाब मुस्लीम तर प्रजा प्रामुख्याने हिंदू अशी होती. असे असले तरी हा लढा मुस्लीमांच्या विरुद्ध हिंदू असा नसून भारतात विलिन होण्यास इच्छुक नसलेले जंजिर्याचे सिद्दी नबाब विरुद्ध स्वातंत्र्यप्रिय अठरापगड जातींचा होता, मग त्यात हिंदूही होते आणि मुस्लीमही होते. मुळात हिंदूबहुल विभागात नबाबाचे संस्थान कसे, असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. तो काळ असा होता की ज्याच्या मनगटात ताकद आणि मेंदुत युक्ती आहे तो कुठेही राज्य करु शकत होता. सद्य जंजिर्याच्या जागी त्याकाळी लुटारु आणि चाचे लोकांच्या उपद्रवापासून बचाव व्हावा म्हणून कोळ्यांनी राम पाटलांच्या नेतृत्वाखाली उभारलेला मेढेकोट निजामशहाने पाठवलेल्या पिरमखान या हबशी सरदाराने १४९० साली ताकद आणि युक्तीच्या जोरावर जिंकला होता. त्यानंतर या परिसरात त्यांनी आणि त्याच्यानंतरच्या शासकांनी आपली पाशवी दहशत निर्माण केली. पुढे पिरमखानच्या मृत्यूनंतर त्याच्याजागी बुर्हाणखानाची नेमणूक झाली. त्याने तेथे त्याने १५६७ ते १५७१ या चार वर्षांत निजामाच्या परवानगीने भक्कम किल्ला बांधला. पुढे १६१७ मध्ये सिद्दी अंबर याने बादशहाकडून स्वतंत्र सनद मिळवून जहागिरी प्राप्त केली. तो या संस्थानचा पहिला नबाब ठरला. त्यानंतर एकूण यानंतर १९४८ पर्यंत २० सिद्दी नवाबांनी जंजिरा किल्ल्यावर हक्क गाजवला.

छत्रपती शिवाजी महाराजानी चार वेळा प्रयत्न करुनही थोडक्यात जंजिरा हातातून निसटला, त्यांना जर या मोहिमेसाठी पुरेसे आयुष्य आणि पुरेसा वेळ मिळाला असता तर त्यांच्यासाठी जंजिरा जिंकणे अशक्य नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. छत्रपती संभाजी महाराजाच्या हातात जंजिरा येत आहे हे पाहून औरंगजेबाने हसनअली या सरदारला चाळीस हजाराची फौज घेऊन कल्याण भिंवडीच्या मार्गे रायगडाच्या दिशेने पाठवले. त्यामुळे नाईलाजास्तव महाराजांना रायगडावर फिरावे लागले. त्यामुळेही संभाजी महाराजांच्याही हाती हा किल्ला लागला नाही. मराठ्याच्या हाती जाऊ नये म्हणून मोगल, इंग्रज व पोर्तुगिजांना एकत्र आणणारा हा जंजिरा असला तरी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सरखेल कान्होजी आंग्रे यांनी सिद्दीच्या कारवायांवर अंकुश ठेवून परिसरातील त्याच्या दहशतीपासून जनतेला अभय दिले.

पेशवाईच्या अस्तानंतर १८१८ साली इंग्रजांनी जंजिर्यावर वर्चस्व प्रस्थापित करुन १८३४ मध्ये नबाब सिद्दी मुहम्मद खान (दुसरा) यास मांडलिक केले. तेथील टांकसाळ बंद केली. सिद्दी मुहम्मद खान याने १८४८ मध्ये राज्यत्याग करुन सिद्दी इब्राहिम खान या मुलास गादीवर बसविले. १८६७ मध्ये जंजिर्याचा नबाब व तेथील सरदार यांत तीव्र मतभेद निर्माण झाले. तेव्हा इंग्रजांनी नबाबाला पदच्युत करुन १८६९ साली तिथे इंग्रज रेसिडेंट नेला. पुढे नबाबाने इंग्रजांशी करारनामा केला. तेव्हा त्याचे पद चालू ठेवले, पण अधिकार कमी केले. सिद्दी इब्राहिम खान १८७९ मध्ये मरण पावला. त्याच्या तीन मुलांपैकी (पहिले दोन अनौरस व धाकटा औरस) धाकट्या अल्पवयीन सिद्दी अहमद खान या पुत्रास इंग्रजांनी गादीवर बसविले.





उमाजीदादा कोळुसकर,
अलिबाग



ते राजकोट-पुण्याला शिक्षण घेऊन सज्ञान झाल्यावर त्यांच्याकडे इंग्रजांनी राज्यकारभार दिला. त्यांनी संस्थानात शाळा काढली. मुरुडचे जंगल तोडून रस्ते केले. १८९२ मध्ये पिण्याच्या पाण्यासाठी व्हिक्टोरिया ज्युबिली वॉटर वर्क्स ही योजना राबविली. शिवाय नगरपालिका आणि लोकल बोर्डाची स्थापना करुन पायाभूत सुविधा निर्माण केल्या. या त्यांच्या कार्याविषयी ब्रिटिशांनी त्यांस के. सी. आय. ई. हे बिरुद बहाल केले. त्यांस ७०० लोकांचे संरक्षक दल ठेवण्याची मुभा होती. त्यांच्यानंतर त्याचे पुत्र सिद्दी मुहम्मद खान नबाब बनले. ब्रिटिशांचे मांडलिक असलेल्या नबाबांपैकी शेवटच्या दोन नबाबांनी आपल्या संस्थानात जनहिताची अनेक कामे केली. आपला चांगला ठसा उमटवला आणि आपल्या पूर्वजांच्या चुका सुधारल्या.

अशाप्रकारे १६१७ ते १९४८ अशी ३३१ वर्षे जंजिरा सिद्दीच्याच ताब्यात राहिला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान ब्रिटिशांचा दास्यत्वातून मुक्त झाला, पण त्यांनी या स्वातंत्र्याच्या आनंदात पाचर मारुन भारत आणि पाकिस्तान अशी या देशाची फाळणी केली व संस्थानिकांना या दोनपैकी कोणत्या देशात विलिन व्हायचे हे ठरविण्याचा पर्याय दिला. काश्मीरच्या हिंदू राजाने पर्यायाची निवड करण्यास उशीर केला व त्यातून पाकिस्तानच्या हल्ल्यामुळे काश्मीरचा काही भाग पाकिस्तानात गेला. हैद्राबादच्या निजामाने विलिनीकरणास नकार दिल्यावर सरदार वल्लभभाई पटेल यांनी सैन्य पाठवून हैद्राबाद मुक्त केले. जुनागडच्या नबाबाने पाकिस्तानात विलिन होण्याचा पर्याय जाहीर केला व जनतेने नकार दिला आणि जुनागड भारतातच राहिला. जंजिरा संस्थानच्या नबाबाला पाकिस्तानात विलिन व्हायचे होते, परंतु भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबरोबरच संस्थानापासून स्वातंत्र्य मिळावे ही मागणी जंजिरा संस्थानात सुरु असल्यामुळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला तरी मुरुडचा नबाब संस्थानचे विलिनिकरण भारतात करत नाही, हे पाहून पुन्हा स्वातंत्र्य लढ्याला उठाव मिळाला.

क्रांतीवीर नाना पुरोहित यांनी प्रजा परिषद या संघटनेद्वारे समाजातील सर्व घटकांना जवळ करुन सैन्य उभे केले आणि राजाभाऊ चांदोरकर, हरिभाऊ भडसावळे, मोहन धारिया, सदाशिव बागाईतकर, भिवा पवार, गुणाजी लोखंडे, पुतळाजी पाष्टे, रामभाऊ साठे, विठोबा जाधव, नामदेव दळवी, अच्युत भट, बापुसाहेब राजे, बापूसाहेब दातार, केशवराव खांबेटे, बापूसाहेब करडे, राम चिटणीस, केशवराव कदम आदी हजारो सहकार्यांसह जंजिरा मुक्तीचा लढा सुरु केला. त्यांनी १९४८ च्या २८ जानेवारी रोजी म्हसळा आणि ३० जानेवारी रोजी श्रीवर्धन ताब्यात घेतले. दुर्दैवाने याच दिवशी महात्मा गांधी यांची हत्या झाली होती, तरी दु:खाला आवर घालून स्वातंत्र्यसैनिकांनी ही कारवाई केली होती. या कारवाईनंतर रातोरात भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल, मुंबईचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर आणि मुरुडचे नबाब सिद्दी मुहमद खान यांना श्रीवर्धन पोस्टातून 'म्हसळा, श्रीवर्धन मुक्त. उद्या मोर्चा मुरुडवर' असा मजकूर असलेल्या तारा रवाना झाल्या. या तारेने नबाबाचे धाबे दणाणले. ताबडतोब त्यांनी ३१ जानेवारी रोजी मुंबईकडे धाव घेतली आणि आपण सामीलनाम्यावर सही करायला तयार असून, मुरुडवरचा हल्ला थांबविण्याची त्यांनी मुख्यमंत्री खेरांना विनंती केली. खेरांना नानासाहेब पुरोहितांची तार मिळाली होतीच. त्यांनी सामीलनाम्याचे कागद तयार केले आणि नबाबांपुढे ठेवले. भेदरलेल्या नबाबांनी त्यावर लगेच स्वाक्षरी केली. ताबडतोब खेरांनी ही बातमी नानासाहेब पुरोहितांना कळवली. त्यांनी जंजिरा किल्ल्यावर तिरंगा फडकविला आणि जंजिरा संस्थान बरखास्त केल्याचे जाहीर केले. त्यानंतर तेथे निर्नायकी होऊ नये म्हणून हंगामी सरकार स्थापन केले गेले आणि पुढील ४ दिवस संस्थानचे पंतप्रधान म्हणून नानासाहेब पुरोहितांनी भूमिका बजावली. ५ फेब्रुवारी १९४८ रोजी संस्थानची सर्व सूत्रं तत्कालिन जिल्हाधिकारी झुबेर यांच्याकडे त्यांनी सोपव ली आणि अधिकृतपणे जंजिरा संस्थान रक्ताचा एकही थेंब न सांडता स्वतंत्र भारतात विलिन करण्यात झाले. अजिंक्य समजल्या जाणार्या जंजिर्याची घमेंड जनतेच्या स्वातंत्र्याच्या ध्यासाने मोडली. तेथे लोकशाहीचे पर्व सुरु झाले. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे याच लोकशाहीत या लढ्याची उपेक्षा झाली.

हैद्राबादचा मुक्ती लढा सैनिकी कारवाईमुळे यशस्वी झाला, पण मराठवाड्यात त्या लढ्याचे स्मरण दरवर्षी शासकीय पातळीवर केले जाते, पण रायगडात जनआंदोलनातून एक संस्थान भारतात विलिन झाले त्या लढ्याची व तो लढणार्या देशभक्तांची सरकार दखल घेत नाही, हा करंटेपणा कुठपर्यंत चालणार? सरकारने आतातरी जागे व्हावे आणि या आगळ्या मुक्ती लढ्याचे शासकीय पातळीवरुन दरवर्षी स्मरण केले जावे, हीच अपेक्षा.

# ‘अखंड’ एका नव्या पर्वाची सुरवात..

— विवेक ताम्हणकर





अखंड या संस्थेने बालचित्रकला अभियानातून नवी चळवळ उभी केली


कणकवलीतील कातकरी वस्तीतील घरे

समाजाचं सांस्कृतिक वैभव कुठल्याही भौतिक श्रीमंतीपेक्षा माणसाला समृद्ध करीत असते. समाजाला जसा राजकारणाचा एक चेहरा असतो, तसा त्याला समांतर दुसरा सांस्कृतिक चेहराही असतो. विविध ललित कलांच्या संगमाचा प्रवाह जेवढा सशक्त होत जातो; तेवढा समाज वैचारिकदृष्ट्या अधिक प्रगल्भ होत जात असतो. या पार्श्वभूमीवर आपल्याकडे साहित्य, नाट्य, संगीत कला विविध माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचत असते, त्याचवर वैचारिक चर्चा होत या कलांचा आजचा विचार जगासमोर मांडला जातो. यामुळे नव्या कलावंतांना आपली कला पुढे विकसित करण्याची प्रेरणा मिळते. शिवाय कलावंतांना त्यांच्या कलेचा एक ठळक चेहरा प्राप्त होतो. विशेष म्हणजे तो कलावंत आपल्या कलेशी आणि त्यातूनच समाजव्यवस्थेशी जोडला जातो. यातून त्याची कला पुन्हा नव्या पिढीशी नाते जोडत जाते. त्याचबरोबर या सगळ्यातून त्या कलावंताचं आपल्या कलेबाबतचे आत्मभान वाढीस लागते. विशेष म्हणजे या साऱ्या कलांची देश पातळीवर संमेलने होतात. मात्र चित्र, शिल्प आणि त्याला पूरक ठरणाऱ्या कलांचे इतर कलांप्रमाणे संमेलन होत नसल्याने हा फायदा त्या कलेतील कलावंतांना मिळत नाही. चित्रकला हि अशी एक कला आहे कि, या कलेतील कोणत्याहो स्थरातील, कोणत्याही भाषेतील कलावंत चित्रकलेच्या माध्यमातून व्यक्त झाला असेल तर त्याची कला कोणत्याहि स्थरातील, कोणत्याही भाषेतील चित्रकलेची आवड असणाऱ्या रसिकाला सहज कळते. तो आपल्या दृक माध्यमातून समोर असलेल्या चित्राचं निरीक्षण करून त्या चित्रात व्यक्त झालेले भाव याचा विचार करत चित्रकाराला जे सूचित करायचे आहे त्या पलीकडील आयामांचा शोध घेऊ शकतो. इथे त्याला कोणत्या भाषेतल्या चित्रकाराने चित्र काढले आहे, याचा अंदाज बांधावा लागत नाही त्यामुळे साहित्यापेक्षा हि कला एकूण समाजाला एकाचवेळी बांधून ठेवत असते. एवढच नाही तर भाषेचा उगम याच कलेच्या माध्यमातून होताना आपल्याला दिसतो. कारण चित्र पाहून त्या कलेत विस्तारलेल्या अर्थछटांची माहिती भाषा शिकू पाहणाऱ्या व्यक्तीला आपण सहज देऊ शकतो. मात्र असं असल तरी अशा बहुमोल कलेचं आणि त्याला पूरक ठरणाऱ्या ईतर कलांचं एकत्रित संमेलन आजवर झालेलं नाही आणि त्याचमुळे चित्र-शिल्प कला संमेलन घेण्याची कल्पना "अखंड लोकमंच" या संस्थेने समोर आणली. गतवर्षी कणकवलीत पहिले संमेलन पार पडले आणि आता त्याच जोमाने विद्यानगरी पुणे येथे दुसरे संमेलन होत आहे.

मुळात इथपर्यंतचा अखंड लोकमंचचा प्रवास अनेक चळवळीतून आणि अडचणीतून झालेला आहे. विविध पातळीवरच काम संस्थात्मक पातळीवर विखुरल गेलं आणि त्याचा आज "अखंड" वटवृक्ष झाला आहे. नामानंद मोडक हे कणकवलीत एक चित्रकार, कणकवलीकरांपुरती त्यांची एवढीच काहीशी ओळख होती. आज मात्र ती बदलली आहे. स्वामी आर्ट हा बाजारपेठेतील त्यांचा स्टुडिओ सर्वांना माहित आहे. सुरवातीला चित्रात रमलेला नामानंद एका अनामिक ओढीने समाजाशी जोडला जात होता, किंबहुना सामाजिक भावनेतून विविध स्थरावर सामाजिक कामात ओढला जात होता. कदाचित समाजात घडणाऱ्या घटनांचा त्याच्या एकंदरीत संवेदनशील कलावंताच्या मनाला काहीतरी खटकत असाव. त्याच्यातील वेगळीच प्रतिभा आणि अस्वस्थता बाहेर येत होती. यातूनच “स्वामी आर्ट्स” या ग्रुपच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी उपक्रम सुरु झाले. कलावेध, श्रमिक मुक्तीवेध, वाचानवेध अशा परिवाराची निर्मिती झाली. काम वाढत असतांना कला, साहित्य आणि संस्कृती अशा अनेक अंगात विखुरलेल्या या कामाला संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाल. “अखंड” या भल्या मोठ्या संस्थेने जन्म घेतला. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या अखंड या साहित्य प्रकारावरून या संस्थेच नाव ठेवलेले आहे.

मोडक यांचं सन २००७ मधाळ एक प्रदर्शन आम्ही कणकवलीच्या गडनदी पात्रात पाहिलं. वीर क्रांतिकारक भगतसिंग यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कार्याची लोकांना जाणीव व्हावी आणि त्यांच्या कार्याला सलाम म्हणून मोडक यांनी अगदी भगतसिंग यांच्या प्रतिमेला अभिप्रेत असे अगदी प्रवाहाच्या विरुध्द विचार करायला लावणारे इंस्टॉलेशन आणि चित्र प्रदर्शन त्या नदीपात्रात मांडले आणि सर्वांनाच अंतर्मुख व्हायला लावले. गझल नवाझ भीमराव पांचाळे यांच्या गायनाची सुरेल मैफल याच नदी पत्रातील एका खडकावर झाली आणि कला व संगीताची अद्‌भुत धून सिंधू सागराला जाऊन मिळाली त्याच स्वरांनी आज भारतवर्षात “अखंड” गजर सुरु केला आहे.

“ श्रमिक मुक्तीवेध” हा विचार संस्था काम करू लागली. आज या संदर्भात जे काम कणकवली चाललाय त्याने अनेकांचा लक्ष वेधून घेतला आहे. कोकणात कातकरी आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र तो समाज विखुरलेल्या अवस्थेत आहे. बहुतांश लोकांकडे ते या भारत देशाचे नागरिक असल्याचे साधे पुरावे नाहीत.



कणकवलीतील गडनदीपात्रात नामानंद मोडक यांनी भगतसिंग यांना अभिवादन करण्यासाठी घेतलेले इंस्टॉलेशन आणि चित्र प्रदर्शन


कातकरी आदिवासिंचा हा टमरेल मोर्चा व्यवस्थेला जाग आणणारा ठरला



भारतीय कलेतील स्थित्यंतरे याचा विचार करताना इतिहासातील धर्म, सत्ता, यांच्यातील स्थित्यंतराचा मागोवा घेणे म्हत्वाचे ठरेल. सिंधू संस्कृतीत भारतीय दृककलांची सुरवात झाली. मौर्य काळापासून, बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी खऱ्या अर्थाने कलेचा जन्म झाला आणि हिंदू कलाविष्काराचा उगम झाला. तेव्हापासून पाल, जैन, मोघल व नंतरच्या राजपूत हिंदू, मराठा अशा लघुचित्र शैली निर्माण होत विविध रूपे घेत बहरत गेली. मूर्ती पूजेच्या प्रभावातून जन्मलेली हि कला आपल्या वैदिक तत्वज्ञानाच्या सहकार्याने, तिच्या अनुषंगाने ह्या कलेचा विकास झाला. भारतीय संगीताचे मुळहि सामावेदिक संगीतात दिसते. दगड, धातुसारख्या लय माध्यमातून चैतन्याचे एक रूप म्हणून कलावंताला भावलेले मनोमन सत्य शिल्पकलेतून अवतरल. खऱ्या अर्थाने भारतीय कलेचे सुवर्णयुग सुरु झाले ते गुप्त काळातील कला प्रेमी गुप्त सम्राटाच्या राजाश्रयाखाली. कलाकृती म्हणजे कलावंताने निर्माण केलेली अनुभवांची नवीन रचनाकृती. ज्या जीवनाचे स्वरूप ती न्याहाळत, त्या जीवनाच्या प्रमुख वैशिष्ट्याचा म्हणजेच सचेनत्वाचा ती प्रत्यय देऊ शकली नाही तर ती सिद्ध होत नाही. कलाकृतीची निर्मिती हि एक जाणीव पुर्व क्रिया आहे. इतिहास शिकवताना हि अनुभूती आपल्यात उतरली तरच आपण त्याचे कार्य खऱ्या अर्थाने, विश्लेषण व अवलोकन करू शकतो.

- अरविंद हाटे




भारतीय सौदर्यविषयक विचारांना आध्यात्मिक अनुष्ठान लाभल आहे; पाश्च्यात्य सौदर्यदृष्टी हि भौतिकवादी आहे. पौर्वात्य सौदर्यदृष्टी हि अंतर्मुख तर पाश्च्यात्य सौदर्यदृष्टी बहिर्मुख राहिली आहे. भारतीय आणि ग्रीक कलेत हा भेद स्पष्टपणे जाणवतो. ग्रीकांचा कलाविषयक दृष्टीकोन तर्काधीष्टीत होता, तर भारतीयांचा भावनेवर आधारित होता. ग्रीक कलाकारांनी मानवी शरीराला त्याच्या रंग-रुपात आदर्शवत प्रस्तुत करून भौतिक सौदर्याची परिसीमा गाठली, तर भारतीय कलाकारांनी कलाविष्कारात आध्यात्मिकतेला म्हत्वाचे स्थान देऊन स्वताची गहन अंतर्दृष्टी अधोरेखित केली आहे. पहिल्यान भौतिक शरीराच गुणगान केल, तर दुसऱ्यान शरीराच्या अंतकरणात व्याप्त असलेल्या आत्म-प्रकाशात स्वतःला न्हाऊ घातलं. भारतीय कलेत वासनामय अभिव्यक्तीला थारा नव्हता. कोणार्क, अजंठा, दक्षिणेकडील प्राचीन मंदिरे, त्यांची गोपुरे हे सारे गहन तत्व प्रतिबिंबित करत. एवढच नाही तर नायक-नायिका व सुंदर- सुंदरीच्या प्रस्तुतीकारणात मातृत्वपक्षाला प्रामुख्याने विचारात घेतलं आहे. कामपक्षाला नव्हे ! त्यांचे भरदार वक्ष व पुष्ट नितंब मातृत्वाच्या भावनेने स्पंदित झालेले आहेत. कामोत्तेजक नाहीत. भारतीय शिल्पकलेत नैसर्गिक आणि आध्यात्मिक दोन्हींचा संगम झालेला आहे. म्हणूनच भारतीय कलेला “मोक्षप्रदायिनी” म्हटले आहे.

– पंकज भांबुरकर



अभिरुचीमध्ये सर्वसमावेशकता असायला हवी. उच्च-नीच, नागर-ग्रामीण, अभिजात-लोककला असे कोणतेही पूर्वग्रह असू नयेत. अभिरुची विशिष्ट संस्कृतीशी आणि विशिष्ट संकेताशी निगडीत असली कि त्यात एकारलेपणा येतो. अभिरुची जर भिन्न संस्कृतींना, सामाजिक स्थराना, विविध कलाप्रकारांना सामाऊन घेणारी असेल तर ती अधिक समृद्ध होते. विसाव्या शतकात पाच्यात्य संस्कृतीत अनेक प्रवाह येऊन मिसळले. आजच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे चित्रकलेतील विविध कौशल्ये आत्मसात करण्याची गरज उरलेली नाही असा एक गैरसमज तयार झाला आहे. परंतु आजच्या संगणकाच्या युगात मुलभूत कलातत्वांचे शिक्षण अधिक महत्वाचे झालेले आहे. आजच्या काळात एकीकडे जागतिकीकरण आणि दुसरीकडे स्वताची ओळख जपण्याची धडपड असे द्वद्व कलेच्या प्रांतात निर्माण झालेले आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचे स्वागत करत असतांना भारतीयत्व कस जपता येयील याचा विचार करायला हवा. त्यासाठी या मातीतल्या जीवनप्रेरणा नव्या संदर्भात कशा आविष्कृत करता येतील यावर भर द्यायला हवा. कलानिर्मिती आणि त्याचा आस्वाद यांचा अंतिम हेतू आत्मजानिवांचा तसेच जीवनार्थाचा शोध हाच असतो. कलेतील कुशलता, एकाग्रता, सहनशीलता आणि भिन्न विचारांबाद्दलची स्वागतशील वृत्ती ज्या समाजात असेल त्या समाजाची अभिरुची निकोप आणि श्रेष्ठ ठरते.

– दीपक घारे



आज चित्रकाराची चित्र किती रुपयाला गेलीत यावरून त्याची उंची ठरविली जाते हे दुर्दैव आहे. मात्र आपला समाजच पोटभरू असल्यामुळे हि वैचारिक मानसिकता आहे. सांस्कृतिक श्रीमंतीला महत्व नाही. गायतोंडे याचं चित्र ३० कोटीला विकल गेल यावरून त्यांची ओळख करून दिली जाते मात्र गायतोंडे यांच्या कामाची उंची कोणी पाहत नाही याचे दुख वाटते. दुसरी गोष्ट असी कि चित्रकलेचा अभ्यास आणि क्रियेटीव्हीटी याच्यातला फरक आमच्या अभ्यासक्रमात नाही. अभ्यास कसा करायचा एवढाच आहे. का करायचा हे नाही आणि ते मास्तरांच्या डोक्यातही नाही. त्यामुळे ते आमच्या विद्यार्थ्यांच्या डोक्यातही येत नाही. ते चित्र काढतात पण ती एक क्राफ्ट असते. त्यातला विषय समजतो मात्र आशयापासून ते चित्र खूप दूर असते. याकरता असरोंडी येथील रानावनातल्या या वर्कशॉपमध्ये ५ वर्ष मूल शिकली तर त्यांच्या डोक्यात प्रकाश पडून त्यांच्या कलाकृतीत आशयघन असतील यावर माझा पुरण विश्वास आहे. कला हि शिकवता येत नाही, ती शिकावी लागते. चित्रांबद्दल अलीकडच्या काळात बरेच वाद झालेत त्याच समाजाचा मी एक भाग आहे याचे मला दुख होते. मात्र चित्रकार हा मुळात मवाळ धर्मीय आहे.त्याला मोर्चा काढता येत नाहीत. इथलाच नाही तर जगभरातील चित्रकार सहनशील आहे. त्याची हि सहनशीलता निर्मितीसाठी आवश्यक आहे.

– प्रभाकर कोलते



“ अखंड लोकमंच” आणि नामानंद मोडक याचं काम आज लहान वाटेल, पुढे याचे श्रेय घ्यायला अनेक लोक उभे राहतील. या कामाची व्याप्ती किती मोठी आहे हे मला समजल तेव्हा त्याच्यासोबत किती राहू आणि किती नको अस मला झाल. मी फारतर त्याच्यासाठी आलेल्या पाहुण्यांकर्ता गाऊ शकतो. तुम्ही रंगाची भाषा बोलता, तुमच्याकडे रंग आहेत, माझ्याकडे सूर आहेत. तुमच्या दोन संकल्पना आहेत, मूर्त आणि अमूर्त. आमच्याकडे ७ आणि ५ बारा सूर आहेत. त्याचा मूर्त असण्याशी संबंध नाही. त्याच्यातील फ्रीक्वेंशी अड्जेस्ट करून “सा” वाजवावा लागतो. एक तर इतक्या इतक्या लांबीची, इतकी इतकी वेळा ताणली आणि ती छेडली व १८० वेळा वाजली कि “सा” होतो. काय संबंध, ह्या तांत्रिक परिभाषा झाल्या. मात्र यावर चिंतन करताना असे लक्षात आले किंबहुना हाती गवसले ते म्हणजे जगातला पहिला आवाज हा “सा” आहे. घर्षणाने, आघाताने निर्माण होणारा कुठलाही नाद हा “षड्ज” आहे. मग या पृथ्वीवरचा पहिला “षड्ज” काय असेल तो किती व्यापक असेल हे लक्षात घ्या. म्हणून मीही मूर्त आणि अमुर्ताच्या भाषेत बोलतो, मात्र गझलमधील शब्दांमुळे मला स्वरांच्या माध्यमातून आशय व्यक्त करता येतो म्हणून तो मूर्त आहे. शब्द गाताना त्यातील दडलेलं चित्र मला दिसत आणि मग मी स्वरांच प्रयोजन करू लागतो, त्यातूनच तुमच्याशी जोडला जातो.

– भीमराव पांचाळे

# चित्रांची भाषा बोलणारे ते दिवस

– किशोर राणे



चार भिंतीआड अंतर्मनाचा शोध घेत कलाकृती रेखाटणारे चित्रकार त्यादिवशी असरोंडीच्या आमराईत दाखल झाले होते. देशाच्या विविध कानाकोप-यांतून आलेल्या चित्रकारांनी संवादाची देवाण-घेवाण सुरू केली आणि मग कॅनव्हासवर जे-जे काही साकार झाले ते सारेच अफलातून होते. नवनिर्मितीच्या शोधात या चित्रकारांनी बरेच काही नवे असे तयार केले होते. प्रत्येक चित्र बोलत होते. काहीतरी सांगत होते. निसर्ग त्यांच्या कॅनव्हासवर येऊन थांबला होता. निसर्गाच्या दृश्यपटलाच्या आतीलही बरंच काही दिसू लागले होते. अंतर्मनातल्या भावना प्रकट होत होत्या. पाच दिवस, पाच रात्री शेकोटीवरच्या गप्पांमध्ये चित्रांचीच भाषा होती. असरोंडी येथील व्ही. के. सावंत यांची वृक्षवल्ली आमराई चित्रमय झाली होती.

कोकण ही भूमी एक अजब रसायनाची भूमी आहे. येथे कलावंत घडतात. संस्कृती जपली जाते, कला जोपासली जाते, परंपरा राखली जाते. आमच्याबरोबर आमचा निसर्ग गाणे गात असतो, चिमणीपाखरं किलबिलत असतात. या भूमीतला कलावंत जसा व्यक्त होत असतो, तसा इथला निसर्ग सर्जनशीलतेला हाक देत असतो. या नितांत सुंदर वातावरणात प्रत्येक जण भाकरी आणि फुलांचा रसास्वाद घेत असतात. येथे कलावंत भरपूर आहेत, चित्रकार आहेत, शिल्पकार आहेत, साहित्यिक आहेत, अभिनय क्षेत्रात वावरणारी मंडळी आहेत. कोणाकोणाचीही कमी नाही. मग असं सगळं असतानासुद्धा नवनिर्मितीचा शोध चाचपडत होता. चार भिंतींआड तो रंगाशी खेळ खेळत राहिला. आहे त्याच्यातच त्याने समाधान मानले. मी समाजाला दिशा देऊ शकतो, मी व्यक्त होऊ शकतो, मी व्यक्त होणे म्हणजे यापेक्षाही बरेच काही करू शकतो याचे भान तो विसरला होता. आपल्या ब्रशची ताकद, रंगांची किमया, त्याच्या मनातच साठून राहिली. ती प्रवाही व्हायला हवी होती. पण.. जसे चित्रकारांचे तसेच शिल्पकारांचे. या सर्व चित्रकारांच्या सर्जनशीलतेला फुंकर घातली ती अखंड लोकमंच संस्थेचे अध्यक्ष चित्रकार नामानंद मोडक यांनी!

तुम्ही व्यक्त व्हा. समाज म्हणजे काय? त्या समाजातील भल्याबु-यांचे दर्शन घडणारे, त्याला सुबोध करणारी कला तुमच्या कॅनव्हासवर चितारू द्या अशी एक हाक दिली. कलावंतांची मने एकत्र आली अन् एक चमत्कारिक विचार प्रकट झाला, तो म्हणजे अखिल भारतील कलावंतांचे संमेलन!

चित्रकार व्यक्त होत असताना तो मनाच्या अंर्तगृहापर्यंत पोहोचलेला असतो. खोल खोल मनाच्या तळाशी जाण्याचा त्याचा प्रयत्न असतो. कारण डिजिटलायझेशनच्या युगात जसे दिसते तसे रेखाटणे, त्याचे चित्रीकरण करणे हे श्वास घेण्याएवढे सोपे झाले आहे. अशा वेळी दिसणा-या चेह-यामागचाही दुसरा चेहरा जगासमोर आणण्याचे मोठे दिव्य चित्रकाराला करावे लागणार आहे. हा चेहराच समोर आणण्यासाठी चित्रकाराने आपल्यातील कलावंताला जिवंत ठेवायला हवे.



आतापर्यंत झाले असे, मी आणि माझा या कोषात चित्रकार गुंतून गेले. त्यांचे हात जे-जे रंगवेल ते-ते सुंदर आहे असे दाखविण्यातच व्यस्त राहिले. कोणी गणपती करत राहिला, कुणी भिंतीवरच चित्र रेखाटत राहिला.. कुणी पोस्टर करत राहिला.. माझी स्वत:ची निर्मिती, या नव्या सुखाचा ध्यास त्याला भाकरीच्या प्रश्नामुळे बाजूला सारावा लागला. आमच्या भागातील कातळ शिल्पांवर कलावंत व्यक्त झाले आहेत. पण त्यांना मर्यादा होत्या. आता मर्यादेचे पाश झुगारून चेह-यामागचा चेहरा शोधणे चित्रकारांसाठी मोठे दिव्य असणार आहे. या विचारातूनच अखिल भारतीय स्तरावर चित्रकारांचे संमेलन घ्यावे असा एक विचार मनात आला आणि कणकवलीचे कलावंत पुढे झाले. अखंड लाकमंच आकार घेऊ लागला. चार भिंतींच्या आड काम करणा-या कलावंतांनी आपले आकाश खुले केले.



कोकण हे एक निर्मितीचे केंद्र आहेच, याचाच एक पुन्हा नवा इतिहास येथे घडत आहे. कलावंत एकत्र होत आहेत. त्यांच्या कॅनव्हासवर आता बरेच नवे काही उमटू लागले आहे. एक अभिजात अशी नवी संस्कृती आणि कालपर्यंत जे मेंदूत खदखदत होते ते लाव्हारसाप्रमाणे उफाळून येऊ लागले आहे. सारेच व्यक्त होऊ लागले आहे. या पार्श्वभूमीवर चित्रकारांनी चर्चा करावी, त्यांनी आपल्या कोषातून बाहेर यावे, सर्जनशीलतेची देवाण-घेवाण व्हावी, एकमेकांशी संवाद साधला जावा, यासाठी गतवर्षी युवा चित्रकारांची कार्यशाळा कणकवली असरोंडी येथील व्ही. के. सावंत यांच्या आमराईत संपन्न झाली. थेट निसर्गाबरोबर संवाद साधण्याचा कलावंतांना योग आला. पाच दिवस, पाच रात्री कलावंत व्यक्त होत होते. या चित्रकारांमध्ये दिल्ली, गोवा, उज्जन, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, इंदौर, उडपी, कर्नाटक यांसह राज्यातील फाईन आर्टच्या शेवटच्या वर्षाला असलेल्या काही निवडक १६४ चित्रकारांना निमंत्रित करण्यात आले. देशभरातील या चित्रकारांच्या विचारांची देवाणघेवाण व्हावी. त्यांच्या कल्पनाशक्तीतून नवं काही पुढे यावे यासाठी घेतलेल्या या कार्यशाळेतून बरेच मंथन झाले.




वृक्षवल्लीत निसर्गासारखे जगत चित्रकारांनी तयार केलेली पोट्रेट, कॅनव्हासवर त्यांनी फिरवलेले हात अंतर्मुख करणारे होते. चेह-यामागचा चेहरा दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. याचेच दर्शन या चित्रकारांच्या कलाकृतीतून झाले. काही पेंटिंग्जही थेट बोलत होती. साध्या सोप्या शब्दांत बरेच काही सांगत होती. अगदी उथळपणे.. तर काही शांतपणे अंतर्मुख होण्यास भाग पाडत होती.

▶


येवा कोकणात
शुक्रवार, दि. ०९ फेब्रुवारी २०१८









काही असतात असे बघताचक्षणी साद घालणारे तर काही चेहरे असे असतात की, जे शांतच राहतात.. त्यांच्याशी जसजसा संवाद वाढत जातो तसतशी त्यांच्यातील खुबी समजू लागते. त्यांचा विचार लक्षात येऊ लागतो. चित्रांचेही असेच वाटले आम्हाला.

ही युवा कार्यशाळा आयोजित करणा-या अखंड लोकमंचचे अध्यक्ष नामानंद मोडक या चित्रकाराने आपली भूमिका मांडताना स्पष्टच केले. आजपर्यंत आमचे चित्रकार किंवा आम्ही पोटार्थी काम करत आलो. पण मनाला समाधान वाटेल. सामाजिक भान जपले जाईल. असे आम्ही काय केले? याचा अंतर्मुख होऊन विचार करताना मिळणारी उत्तरे उदासीन करणारी होती. अशा वेळी आम्ही व्यक्त व्हायला हवे. चित्रकारांनी आपले बंध झुगारून नेहमीच्या वर्तुळातून बाहेर यायला हवे, चौकट मोडायला हवी असा आमचा प्रयत्न आहे. चित्रकारांनी आता समाज म्हणून विचार करायला हवा. यासाठीच आमचा प्रयत्न सुरू आहे.

आपली वारली चित्रशैली असो वा ठाकरशैली असो यातच कलाकृती थांबणार आहे काय? त्यापेक्षा वेगळी शैली आपली असू शकत नाही का? आपण निर्मितीच्या अंगाने विचार कधी करणार याची जाणीव करून देण्याचा विडा लोकमंचने उचलला आहे. सर्वच कलाक्षेत्राबाबत चित्रकारांनी विचारमंथन करायला हवे, यासाठी अखिल भारतीय पहिले चित्र संमेलन कणकवलीत झाले आता दुसरे पुणे येथे होत आहे. हे संमेलन म्हणजे केवळ चित्रप्रदर्शन असू नये. दोन-चार दिवसांचा महोत्सव होऊ नये, अगर एकांगी विचार करणारा मेळावा भरू नये यासाठी आमची धडपड आहे, कणकवलीत आम्ही हा विचार प्रत्यक्षात आणला आहे पुणे येथे तो आणखीन प्रकर्षाने अमलात आणला जाईल असे मोडक स्पष्ट करतात.



या पार्श्वभूमीवर चित्रकारांची जागरूकता वाढावी यासाठी आमच्या मुलखात जणू एक विचारांची चळवळ सुरू झाली आहे. शालेय स्तरावरहि अनेक स्पर्धा घेण्यात आल्या, सिंधुदुर्गातील चार तालुक्यातून घेण्यात आलेल्या या स्पर्धेत सात हजार लक्षवेधी चित्रे मुलांनी चितारली. हे लहान मुलांचे काम कायमस्वरूपी राहायला हवे. त्यांच्यातील चित्रकार कोमेजून जाऊ नये यासाठी एक सांस्कृतिक केंद्र तयार व्हावे, एक व्यासपीठ असावे असा प्रयत्न या चित्रसंमेलनातून करण्याचा मनोदय मोडक यांनी व्यक्त केला आहे. अखंड लोकमंच कुठच्याही एका घटकाचा असू नये किंवा व्यक्तिगत मर्जीत वावरणारा असू नये. ते एक संस्थानिकांसारखे होऊ नये असा एक प्रयत्न राहणार आहे असेही ते म्हणाले.

गतवर्षी पाच दिवस झालेल्या चित्रकार्यशाळेत १६४ चित्रकारांनी सहभाग घेतला होता. त्यांचे ते अभिव्यक्त होत असताना त्यांनी जपलेले सामाजिक भान, त्यांचे विचार, ब-यावाईट गोष्टींवर त्यांनी केलेली साधकबाधक चर्चा यातून बरंच काही समजून घेता येत होते.

कलेचा संवाद सुरू झाला होता. या कार्यशाळेनंतर कणकवलीत संमेलन झाले आणि त्यात झालेले विचारमंथन खूप काही देऊन गेले. या निमित्ताने कोकणची ही भूमी एक नवा इतिहास निर्माण करू लागली आहे. एक नवं काही हाताला निश्चितच लागेल. या पर्यटनभूमीत चित्रकारांचे एक नवे कलादालन, नवा विचार घेऊन तयार होते आहे. जगाला एक नवी प्रेरणा मिळणारी ठिणगी उडाली आहे. चित्रकार आपल्या कोषातून बाहेर येत आहेत..आमच्या या लाल मातीत एक अंकूर उमलला आहे.



योग्य दिशा न मिळाल्यास कलाकार भरकटतात, त्यामुळे कलेची निर्मिती होण्यापेक्षा केवळ अनुकरण होत जाते. कलेत पूर्वापार पणा नको, सजगता हवी. यासाठी युवा चित्रकारांची कार्यशाळा घेणे महत्त्वपूर्ण होते, तेच कार्य अखंड लोकमंचने केले आहे ते निश्चितच महत्वपूर्ण आहे.

- अनिल नाईक (प्राचार्य, जे. जे स्कूल मुंबई)

मन रिकामे असले तर नवनवीन विचार करू शकतो. आधीच्याच संकल्पना कवटाळून बसलो तर नवनिर्मिती होणार नाही. चित्रकाराला हे समजलं तर या क्षेत्रात बरंच काही करता येणार आहे. जात, पात, धर्म या पलीकडे जावून चित्रकलेबाबत विचार करता यायला हवा. तसंच एका विषयात गुंतून न राहता चित्रकारांनी अनेक विषय हाताळायला हवेत.

- विख्यात चित्रकार राजेंद्र उसपकर

परंपरेचे पाईक होऊ नका तर नवीन परंपरा निर्माण करा. जे काम हाती घ्याल ते कितीही अडचणी आल्या तरी पूर्ण करा. तुमच्या कामाची दखल निश्चितच आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाईल.

- प्रा. सुरेंद्र जगताप (रहेजा कॉलेज ऑफ आर्टस)

देशभरात आजवर संगीत, नाटक, साहित्य, नृत्य या विषयावर अनेक संमेलने झालीत. पण चित्र आणि शिल्पकलेचं, कलाकारांचं संमेलन आजवर झालेलं नाही. चित्र आणि शिल्पक्षेत्रातील कलावंतांमध्ये नव्या जाणिवा निर्माण व्हाव्यात. कलेचं आणि त्यामागील विचारांचं आदानप्रदान व्हावं या हेतूनं देशपातळीवरचं पहिलं चित्रशिल्प संमेलन कणकवलीत झाल असून दुसर पुणे येथे होत आहे.

- नामानंद मोडक (अखंड लोकमंच संस्थेचे अध्यक्ष)

# ‘अखंड’ एका नव्या पर्वाची सुरवात..

◀ पान १३ वरून

त्या पलीकडे त्यांना अन्य समाज माणूस म्हणून जगायला देत नाही. काही भागात तर चोऱ्या झाल्या तर हक्काचे आरोपी म्हणून पोलीस या लोकाना उचलून घेऊन जातात. मजुरीला कोणी बोलावलं तर त्यांच्याकडून काम करून घेतले जाते मात्र त्यांची पुरेशी मजुरी दिली जात नाही. त्यांची मुले शिकत नाहीत. पुरुष जे काही मिळेल त्यात व्यसन करायला पहिले प्राधान्य देतात. अशिक्षित पणा आणि भटके जगणे यामुळे या समाजाची सर्वार्थानेच दैना झाली आहे. कातकरी समाजातील लोकांना आजही हक्काचा निवारा नाही. एवढेच नाही तर त्यांच्या समाजातील कोणी मयत झाला तर त्याला गावातील स्मशान भूमीत जाळायला जागा मिळत नाही. कुठेतरी गावकुसाबाहेर जाळण भाग पडत. त्यांची संस्कृती, त्यांचे एकंदर जगणे आणि इतर समाज आणि या समाजात असलेली दरी दूर व्हावी म्हणून कणकवलीत संस्थेने श्रमिक मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून १० डिसेंबर २००८ रोजी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने कातकरी आदिवासी समाजची दुसरी परिषद घेतली. त्यात प्रामुख्याने कातकरी समाजाची संस्कृती, त्यांचे प्रश्न आणि जीवनमान यावर प्रकाशझोत टाकतानाच या लोकांना अन्य समाजाने माणूस म्हणून स्वीकारावे आणि जगायला द्यावे अशा पद्धतीने विचारमंथन करण्यात आले. कातकरी समाजासाठी जे काम उभ राहिलंय त्याचं फलित म्हणजे कणकवलीतील कातकरी समाजाची मुले आता शिकू लागली आहेत. पुरुषांना व्यवहार समजू लागला आहे. हळू हळू अन्यायाची जाणीव होऊन व्यवस्थेतल आपल स्थान त्यांना समजू लागल आहे. ते पक्क करण्यासाठी आता या लोकांचा आवाज बुलंद होऊ लागला आहे.

सप्टेंबर २०१३ मध्ये कणकवलीत महापूर आला आणि या पुरात जाणवली नदीपात्रालगतच्या कातकरी वस्तीचे मोठे नुकसाकणकवलीतील पुरग्रस्थ कातकरी बांधवाची माहिती घेताना संस्थेचे पदाधिकारी आणि शासकीय अधिकारीन झाले. त्यांचा सारा संसार पुरात वाहून गेला. शासनाने सोडाच साधी वृत्तपत्रानीही त्याची दखल घेतली नाही. संस्थेने याबाबत पाउल उचलले. सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल लाड याना सोबत घेत सूत्र हलवली. तत्कालीन आदिवशी विकास आणि वनमंत्र्यांशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर संबधित खात्याचे अधिकारी कणकवलीत दाखल झाले, त्यांनी झाल्या घटनेची पाहणी केली आणि येथील लोकाना न्याय मिळाला.

ज्या ज्या गावात या लोकांची वस्ती आहे ते गाव शासनाचा हागणदारीमुक्त पुरस्कार मिळवून बसले आहेत मात्र आजही कातकरी आदिवाशींची वस्ती शौचालयाविना वसलेली आहे. या समाजाची हि दैना लक्षात घेता संस्थेने कातकरी आदिवसिंची हि समस्या दूर व्हावी म्हणून काम सुरु केले. कणकवलीच्या जाणवली नदीपात्राच्या कडेला असलेल्या कातकरी समाजाच्या वस्तीतील एक साध उदाहरण सांगायचं म्हणजे या ठिकाणी सार्वजनिक शौचालय नाही. या लोकांना आजही उघड्यावर जाव लागतं आणि हे लोक उघड्यावर जातात म्हणून कणकवली नगर पंचायत या लोकांना दंड आकारते. यावर आवाज उठविण्याचे काम संस्थेने केले. जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधत ९ ऑगष्ट २०१६ रोजी आदिवासिंचा चक्क टमरेल मोर्चा निघाला आणि एकंदर समाज जागा झाला, कातकरी बांधवांनी केळी आणि साग झाडाच्या पानांवर 'शौचालय द्या' अशा घोषणा लिहून आणल्या होत्या. याखेरीज शौचालयात वापरली जाणारी 'टमरेल' सोबत आणली होती. मोर्चात शांताराम पवार, बबन पवार यांच्यासह अनेक कातकरी बांधव आणि महिला सहभागी झाल्या होत्या. व्यवस्था जि झोपेच साँग घेऊन होती तिलाही जाग आली यातून दंडात्मक कारवाई थांबली मात्र आजही या कातकरी वस्थित शौचालय उभ राहू शकल नाही. एवढी आमची सरकारी व्यवस्था मानवताहीन आणि कोडगी आहे.

संस्थेच्या “ वाचनवेधणे” कणकवलीत एक अभिनव चळवळ सुरु केली एक पुस्तक अनेकांनी वाचून त्यावर चर्चा करायची असा नवा उपक्रम सुरु झाला. पुढे त्यात डॉ. आ.ह.साळुंखे, सतीश काळसेकर, उत्तम कांबळे, कवी अशोक बागवे. प्रवीण बांदेकर, वीरधवल परब, अनिल धाकू कांबळी, यासारख्या मान्यवर साहित्यिकांनी भाग घेतला. विख्यात चित्रकार अमृता शेरगिल हिच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त तिला अभिवादन करण्यासाठी चित्र-प्रदर्शन व्याख्यान असे कार्यक्रम घेण्यात आले. अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचे प्रणेते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्तेचा निषेध करून समाजाला जाग आणण्याचे कामही संस्थेने केले. कालादिंडी सारखा उपक्रम घेत लक्षवेधी काम केले.

जागतिक कीर्तीचे चित्रकार एम.एफ.हुसेन यांना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम संस्थेने कणकवलीत घेतला होता. यावेळी स्वामी आर्ट स्टुडिओत इंस्टॉलेशन आणि चित्र प्रदर्शन मांडण्यात आले होते. यावेळी शिवसेना कार्यकर्त्यांनी नामानंद मोडक यांच्यावर केलेला हल्ला आजही सर्वाना ण्यात आहे.

या आणि अशा अनेक कामातून संस्थेच काम पुढे जात असताना २०१५/ १६ मध्ये असरोंडी येथे वर्कशॉप आयोजित करत चित्र-शिल्प कला संमेलनाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. “अखंड लोकमंच” हि संस्था समाजातील सर्वच अंगाने काम करत असताना गतवर्षी या संस्थेने कणकवलीत पहिले अखिल भारतीय चित्र-शिल्प कला संमेलन घेतले आणि हे शिवधनुष्य लीलया पेललेही. आता त्याचा पुढचा भाग म्हणजे पुणे येथे दुसरे संमेलन होत आहे.

पान २१ वर ▶


पुरग्रस्थ कातकरी बांधवाना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप


कणकवलीतील पुरग्रस्थ कातकरी बांधवाची माहिती घेताना संस्थेचे पदाधिकारी आणि शासकीय अधिकारी


असरोंडी येथील वर्कशॉपमध्ये मुलांनी आपल्या प्रतिभेला वाट मोकळी करून दिली



# महाशिवरात्रीचा कवीसंमेलन

— बाळा कदम

महाशिवरात्रीच्या निमित्ताने आपल्या बांबरवाडीत एखादा स्टेज कार्यक्रम करावा असे सरपंच आप्पा गावडे यांच्या मनात आले. आपला विचार त्यांनी काही जणांकडे बोलूनही दाखविला. आणि मग त्यासंदर्भात सिद्धेश्वराच्या देवळात ग्रामस्थांची मिटिंग बोलविण्यात आली.


त्या मिटिंगला स्वत: सरपंच आप्पा गावडे, तातू बावधनकर, बबन्या सुतार, विश्वनाथ पराडकर, किशोर, शित्या चौकेकर, आबा शेलार कविवर्य बबन धारगळकर, तात्या डांगे वगैरे ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. गावात कधी नाही तो स्टेज शो होणार याचे सर्वानाच कौतुक होते. इतरांपेक्षा काहीतरी वेगळा कार्यक्रम करावा असं मत जेव्हा कविवर्य बबन धारगळकर याने मांडले तेव्हा सरपंच आप्पा गावडे त्याला म्हणाले, 'ठीक हा! बबन्या, तूच काय तो येगळो कार्यक्रम सुचव. पन त्येचो खर्च जास्ती आसता कामा नये.' 'माज्या मते यावेळी आपन कविसंमेलन भरवया. अगदी आपल्या बजेटात बसणारो कार्यक्रम आसा.' 'कविसंमेलन म्हंजे नेमक्या काय?' किशोरला हा प्रकार न कळल्याने त्याने भाबडेपणाने विचारलं. त्याच्या शंकेचं निरसन करत बबन म्हणाला, 'कविसंमेलन म्हंजे सगळे कवी एकटय येव्न आपापली कविता सादर करतत.' 'म्हंजे नेमक्या काय करतत? ' 'तुज्या बापाशीचा श्राद्ध घालतत.' किशोरच्या अडाणी बोलण्यावर आबा शेलार जाम वैतागला. पण गावात कधी नाही ते आपल्या कवितांना व्यासपीठ मिळतंय ते हातचे जावू नये यासाठी बबन धारगळकर शांतपणे म्हणाला, 'काय आसता किशोर, जे कविता लिवतत तेंका कवी म्हंतत. अशे कवी संबूर बसतले आनी आपली कविता म्हंतले. आता मी सोता एक कवी आसय. आपल्या गावात हेमलता पाटील हल्ली कविता करूक लागला हा. शिवाय आन्खी दोन-चार कविंका बोलवया. अध्यक्ष म्हणान मोठो कवी हाडया.' 'पन त्येंचो खर्च..' बबनचं बोलणं मध्येच थांबवत आप्पा गावडे म्हणाला. यावर बबन ठामपणे बोलला, 'खर्चाची काळजी नूको. कविसंमेलनाक जो खर्च येतलो तो मी करतंय.'

मग ठीक आसा. गावातलो कोनतरी फु डे येताहा, त्येका आपन सगळयांनी साथ देवया.' गावातला कोणीतरी पुढे जातोय यापेक्षा कविसंमेलनाचा खर्च बबन स्वत: करतोय म्हणूनच तात्या डांगेने आपली संमती दिली. मग सगळयांचेच कविसंमेलनाबाबत एकमत झाले. पहिल्याच बैठकीत कधी नव्हे तो बिनविरोध ठराव झाला.

कविसंमेलनाचे निश्चित झाल्यावर बबन धारगळकर भयंकर खूश होता. आजवर कुठल्याही कविसंमेलनात व्यासपीठ न मिळालेल्या बबनला गावातल्या संमेलनाची मॅनेंजमेंट मिळाली होती. हक्काचे व्यासपीठ मिळाले होते.

बबन धारगळकरने आजवर शंभराच्या आसपास कविता केल्या होत्या. सगळयाच कविता स्वानुभवावर आधारित होत्या. अनेक दैनिक, साप्ताहिक तसेच मासिकांमध्ये त्याने त्या प्रसिद्धीसाठी पाठविल्या. पण का कोण जाणे! एकाही संपादकाला कविवर्य धारगळकरांचा 'स्वानुभव' लोकांपर्यंत पोचवावासा वाटला नाही. त्यामुळे त्याच्या कविता प्रसिद्धीपासून अलिप्त होत्या. स्वत:ला हा बबन शिघ्रकवी समजायचा.

अर्थात त्याच्यात तथ्यही होतं. बसल्या जागी तो पाच-सहा कविता सहज खरडवून काढायचा. त्यानंतर शांतपणे तो यमक जुळवत बसायचा. कविसंमेलनाचं एकदाचं निश्चित झाल्यावर त्याने सर्वप्रथम हेमलताला गाठलं. हल्ली-हल्लीच हेमलता कविता करायला लागली होती. 'पान', 'फू ल', 'कळी' या कवितेंवरूनच ही निसर्ग कवयित्री आहे हे सुजाण वाचकांच्या लक्षात आले असेल.



कविसंमेलनाची एकंदर रूपरेषा निश्चित ठरविण्यासाठी आणि नवीन कवितेची निर्मिती करण्यासाठी बबन रोज संध्याकाळी हेमलताला घेवून गावाबाहेरच्या नदीकाठी जावू लागला. खांद्याला शबनम अडकवलेला बबन आणि पर्स व दोन-चार वहया घेतलेली हेमलता ही जोडी गावातून निघाली की, विहिरीवर पाणी भरत असलेल्या बायकांची कुजबूज सुरू होई.

'तो बग बबन कविता करूक चल्लो. कसो काय कविता करता कळना नाय.' अशांसारखी वाक्ये आणि कुतूहलपूर्वक नजरा त्यांच्यावर खिळल्या की, दोघांनाही कवी झाल्याचे सार्थक वाटे. रोज संध्याकाळी ही दोघं नक्की कसल्या कविता करायला जातात हे पाहण्यासाठी गावातल्या काही टारगट पोरांनी त्यांच्यावर पाळत ठेवली. परंतु नदीकाठी बसून एकमेकांच्या डोळयात बघत त्यांचे 'मूकस्पंदन' पाहून दोन दिवसानंतर पोरांनी हा नाद सोडून दिला.

कदाचित पोरांचे ते उद्योग बबनला माहिती असावेत. कारण पोरं येईनाशी झाल्यावर डोळयांबरोबरच त्यांचे हात, पाय वगैरेसुद्धा एकमेकांकडे बघायला लागले.

खास प्रसिद्ध कवी संदेश ताडगांवकर यांना बबनने कविसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित केले होते. अर्थात हा दीड-दोन हजारांचा खर्च कवितेच्या प्रेमापोटी त्याने बायकोसाठी केलेले मंगळसूत्र गहाण ठेवून केला होता. अध्यक्ष ताडगांवकर जेव्हा बांबरवाडीत आले तेव्हा त्यांच्याबरोबर गावात फिरून लोकांच्या खेचून घेतलेल्या नजरेत त्याचा अर्धा खर्च वसूल झाला होता.

प्रत्यक्षात कविसंमेलनाचा दिवस उजाडला तेव्हा सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोचली होती. कार्यक्रमाला गर्दीही भयंकर होती. फिक्कट गुलाबी रंगाची साडी नेसलेली हेमलता आणि पांढरा झब्बा-लेंगा घातलेला बबन नवीनच लग्न झालेल्या जोडप्याप्रमाणे वावरत होते. गावातल्या या दोन कवींबरोबर जिल्हयातले आणखी तीन कवी व्यासपीठावर स्थानापन्न झाले. अध्यक्ष कविवर्य संदेश ताडगांवकर यांची सन्मानीय उपस्थिती सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती.

तबला-पेटीच्या तालावर धुंद गाणी होणार असं या कार्यक्रमाबाबत सर्वांचंच मत होतं. परंतु कार्यक्रमाला सुरुवात झाल्यावर जसजशा कविता वाचल्या जावू लागल्या तशी लोकांमधली कुजबूज, जांभया, डुलक्या आणि शेवटी-शेवटी बैठकीची आवराआवर सुरू झाली. निसर्ग कवयित्री हेमलताने पान, फू ल, कळी या जुन्या कवितेंबरोबरच खास कविसंमेलनासाठी लिहिलेल्या देठ, खोड, सोटमूळ, गवत, पर्वत आदी दहा-बारा कविता वाचून मागची बरीचशी माणसं उठविण्यात मोलाचा हातभार लावला.

ख-या अर्थी कार्यक्रमाचे हिरो असलेले बबन धारगळकर यांनी स्वानुभवावर आधारित असलेल्या 'माझा पहिला फ राळ', 'मी खड्डयात पडलो तेव्हा..', 'बापाचा मार आणि आईची डागणी' अशा दहा कविता वाचल्या. बबनच्या कविता संपल्या तेव्हा अवघी दहाच माणसे शिल्लक होती. अर्थात ते मंडळाचे कार्यकर्ते होते. काही असलं तरी बबनच्या कवितेवेळी हेमलता मध्ये-मध्ये 'वा! क्या बात है' वगैरे म्हणत असल्यामुळे बबन खूष होता.

अर्थात हेमलताच्या वेळी बबननेसुद्धा चार-पाच वेळा 'बहोत खूब!' म्हटल्यामुळे ती त्याच्या ऋणात होती. सर्वात शेवटी अध्यक्ष ताडगांवकर यांनी सद्यस्थितीवर चार कविता पेश केल्या आणि कविसंमेलनाची सांगता झाली. डोळे चोळत असलेल्या कार्यकर्त्यांनी समाधानाने आवराआवर केली. त्यापैकी एकाने बबनला 'अध्यक्षांपेक्षा तुझ्या कविता ब-या होत्या' असं सांगितल्यामुळे तो हवेतच तरंगत होता. ताडगांवकरांना आपल्या घरी घेवून जाताना बबनने त्यांना विचारलं, 'माझ्या कविता कशा वाटल्या?' ते बिचारे काय बोलणार? ठीक आहे म्हणाले. त्यांचे बोलणं बहुधा बबनला रूचलं नसावं. कारण तो त्यांना लगेच म्हणाला, 'साहेब, तुमच्या कविता ब-या होत्या. पण सर्वसामान्यांना त्या कळत नाहीत. सगळयांना समजलं तरच ते यशस्वी लेखन असं माझं मत आहे.' प्रत्यक्ष कविवर्यांची ही अवहेलना! ताडगांवकर काही क्षण बबनकडे पहातच राहिले. काय बोलावे तेच त्यांना सुचेना. खरोखरच त्यांच्या सोशिकतेला एखाद्याने दाद दिली असती. दुस-या दिवशी ते लवकर उठले. आपलं मानधन घेतलं आणि बबन धारगळकराचा निरोप घेवून मिळेल ती पहिली गाडी त्यांनी पकडली. कारण त्याच्याशी आणखी काही वेळ जरी त्यांनी काव्यावर चर्चा केली तर स्वत:चं काव्य बांबरडवाडीच्या भूमीत गहाळ होण्याची त्यांना अधिक भीती होती.

# खरंच देशात वृत्तपत्रस्वातंत्र्य आहे?

## एस. एम. देशमुख

'युनिक आयडेंटीफिकेशन अॅथॉरिटी ऑफ इंडिया'ला अवघ्या चारच दिवसांत आपली भूमिका बदलावी लागली.'आधार कार्डासाठी सरकारनं जमा केलेली माहिती सुरक्षित नाही,कोट्यवधी कार्डधारकांची माहिती अवघ्या दहा मिनिटात कशी मिळविता येते' यासंबंधीची सविस्तर बातमी द ट्रिब्यूनच्या ३ जानेवारीच्या अंकात प्रसिध्द झाली.बातमी आल्यानंतर अंगावरचं झुरळ झटकावं अशा पध्दतीनं 'युआयडीएआयनं' ही बातमी झटकून टाकली.'असं काही होऊच शकत नाही, बातमी निराधार आहे ,आधारशी जोडलेली सारी माहिती सुरक्षित आहे असा दावा' युआयडीएआयनं केला.सरकारी यंत्रणेचे दोष किंवा यंत्रणेतील त्रुटी दाखवून देणारी बातमी जेव्हा माध्यमांतून येते तेव्हा त्याचा खुलासा कऱण्याची पध्दत आहे.बऱ्याचदा असे खुलासे हे माध्यमांनी कशी खोटी बातमी दिली हे सांगणारे आणि आपल्या अपयशावर पांघरून घाळणारेच असतात.त्यामुळं युआयडीएआयनं नेहमीप्रमाणं तसा खुलासा केला असता तर आक्षेप घेण्याचं कोणतंच कारण नव्हतं.मात्र युआयडीएआय केवळ खुलासा करून थांबली नाही तर बातमी देणाऱ्या 'द ट्रिब्यून'च्या पत्रकार रचना खैरा आणि अन्य चौघांच्या विरोधात थेट पोलिसांत फसवणुकीची तक्रार दाखल केली.माध्यमांना धमकविण्याचा आणि वृत्तपत्र स्वातंत्र्याचाच संकोच करणारा हा प्रकार होता पण त्यामुळं वास्तव बदलत नव्हते. 'आधारसाठी दिलेली माहिती सुरक्षित नाही' याची चर्चा गेली सहा महिने देशात दबक्या आवाजात सुरू होती.तरीही सारे आलबेल आहे अशा थाटात युआयडीएआय वागत होते.रचना खैरा यांनी वास्तव जगासमोर आणल्यानं आपली पोलखोल झाल्याने युआयडीएआयच्या नाकाला मिर्च्या चांगल्याच झोंबल्या.त्यातूनच पत्रकाराला कायद्याच्या कचाटयात अडकविण्याचं 'कारस्थान' रचलं गेलं.मात्र हे कारस्थान आधार यंत्रणेच्या चांगलच अंगाशी आले। पत्रकारच्या विरोधात पोलिसात तक्रार दाखल करून चारही दिवस झाले नाहीत तोच युआयडीएआयनं रचना खैरा यांची बातमी सत्य होती याची अप्रत्यक्ष का होईना कबुली आपल्या कृतिंतुन दिली.आधारची माहिती अधिक सुरक्षित कऱण्यासाठी व्दिस्तरीय यंत्रणा निर्माण करण्याची तयारी आता आधार यंत्रणेनं सुरू केली आहे. यामध्ये व्हर्च्युअल ओळखपत्र ( आयडी) व लिमिटेड केवायसी अशा दोन प्रणालींचा समावेश आहे.या दोन्ही प्रणालींचा अंगिकार एक जूनपासून करणे अनिवार्य करण्यात येत आहे.नव्या प्रणालीमुळे सर्व ठिकाणी पडताळणीसाठी आधारचा बारा आकडी क्रमांक देण्याची गरज भासणार नाही.व्हर्च्युअल आयडी हा सोळा आकडी क्रमांक असून तो नागरिकांना स्वःच तयार करता येईल.हा क्रमांक म्हणजे एक प्रकारचा 'वनटाइम पासवर्ड' असेल.थोडक्यात आधारची माहिती सुरक्षित राहावी यासाठी सरकार आता धडपड करीत आहे.अशी धडपड करून सरकार अगोदरची आधारची यंत्रणा सुरक्षित नव्हती हे मान्य करीत आहे.मात्र 'वराती मागून घोडे' घेऊन येण्याच्या या प्रकारानं फारसं काही साध्य होण्याची शक्यता नाही.कारण असं सांगितलं जातंय की,जवळपास एक लोकांनी आधारची माहिती परस्पर लंपास केलेली आहे.त्यामुळं 'माझी आधारची माहिती गुप्त आहे' असा दावा करता येऊ शकत नाही.हे वास्तव असेल तर या घोडचुकीला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई कऱण्याऐवजी ही चूक दाखवून देणाऱ्या पत्रकारच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचा प्रकार 'चोर सोडून सन्याशाला फाशी' अशातला आहे.ज्यांनी गोपनीय माहिती पळविली,जे या माहितीचा दुरूपयोग करीत आहेत त्यांच्यावर काही कारवाई केली गेल्याचे किंवा तसा सरकारचा विचार असल्याचे संकेत अजून तरी मिळताना दिसत नाहीत.चोरी करणारे मोकाट आहेत.चोरी रोखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या रचना खैरा अडचणीत आहेत.हा अजब न्याय म्हणावा लागेल.

आधारच्या कथित गोपनीयतेचा भांडाफोड रचना यानी केलेला असला तरी आधारबद्दल शंका घेणाऱ्या काही त्या एकमेव नाहीत.विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी ८ एप्रिल २०१४ रोजी 'आधार हा दिखाऊ उद्योग आहे,त्यामागे काहीही धोरण नाही' असं वक्तव्य करून आधारलाच 'निराधार' ठरविले होते.मात्र त्यांच्याविरोधात ना एफआयआर दाखल झाला ना त्यांना नोटीस पाठविली गेली,रिझर्व्ह बॅंकेच्या बॅंकिंग संशोधन व विकास संस्थेकडूनही याबाबत चिंता व्यक्त केली गेली आणि माहिती गुप्त राहण्यासाठी प्रभावी उपाययोजना कऱण्याची सूचना केली गेली होती इतरही अनेक व्यक्ती किंवा संस्थांनी वेळोवेळी आधारबद्दलच शंका उपस्थित केल्या होत्या,आधारच्या माहितीच्या गोपनीयतेबद्दलही प्रश्नचिन्ह निर्माण केले होते .याचाच अर्थ असा की,या व्यवस्थेत काही तरी त्रुटी आहेत हे केवळ रचना खैरा यांच्याच नव्हे तर अन्य सरकारी संस्थांच्याही ध्यानात आले होते.तरीही द ट्रिब्यूननं या विषयाला वाचा फोडेपर्यंत यंत्रणा निद्रिस्त होती.हे संतापजनक आहे.आपल्या निष्क्रियतेचं खापर आज माध्यमांवर फोडून यंत्रणा नामानिराळे राहण्याची कोशीस करताना दिसत आहे.हा डाव हाणून पाडला पाहिजे.

<u>कमला प्रकरणाशी साधर्म्य</u>

सत्य बातमी दिल्याबद्दल किंवा व्यवस्थेचे दोष दाखवून दिल्याबद्दल माध्यमांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं कऱण्याची ही काही पहिलीच घटना नाही.१९८१ मध्ये 'इंडियन एक्स्प्रेसनं' समोर आणलेलं कमलाचं प्रकरण अजूनही लोक विसरलेले नाहीत.'मध्य प्रदेशात महिलांची राजरोस खरेदी-विक्री होते' ही बातमी इंडियन एक्स्प्रेसचे अश्वीन सरीन यांना समजल्यानंतर ते डॉक्टर बनून ढोलपूर परिसरात गेले.तेथे त्यांनी केवळ २३०० रूपयांत कमला नावाची मध्यमवयीन महिला खरेदी केली.त्यांनी बातमीत म्हटलं होतं की,'पंजाबमध्ये म्हशीला जी किंमत आहे त्याच्या अर्ध्या किंमतीत मध्यप्रदेशमध्ये महिला विकत मिळतात' त्यांच्या या बातमीनं जगभर खळबळ उडाली होती.मात्र त्यांनी 'एका महिलेची खरेदी करून कायदा मोडला आहे' असा ठपका ठेवत त्यांच्याविरोधातही गुन्हा दाखल केला गेला होता.अश्वीन सरिन यांनी कायदा तोडला होता का ? तर हो तोडला होता ! पण त्यामागं त्यांचा उद्देश हा निखळ समाजहिताचा होता.झोपलेल्या सरकारी यंत्रणेला जागं करून मानवी देहाचा होणारा बाजार जगासमोर मांडणं एवढाच त्यांचा उद्देश होता.सरकारनं हा मानवी बाजार बंद करावा अशी अपेक्षा असताना माध्यमालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं गेलं..आज भाजपचं सरकार आहे तेव्हा कॉंग्रेसचं सरकार होतं..म्हणजे पक्ष कोणताही असो माध्यमांबद्दलचा दृष्टीकोण किंवा भूमिका समान आहे.यामध्ये डावा-उजवा असा भेद कऱण्यासारखी स्थिती नाही.

मुंबईतील पत्रकार अकेला व्दिवेदी यांच्याबाबतीतही असाच प्रकार घडला होता. २६/११ च्यावेळेस राखीव पोलीस दलाकडील हत्यारं निष्फळ ठरल्यानं नव्या आणि अत्याधुनिक हत्यारांची खरेदी करून ती हत्यारं छत्रपती शिवाजी टर्मिनस परिसरातील शस्त्रागारात ठेवली गेली होती.मात्र छत फुटलेले असल्यानं पावसानं ही सारी हत्यारं गंजून गेली.अकेला व्दिवेदी यांच्या छायाचित्रकारानं त्याची छायाचित्रं काढली,आणि अकेला यांनी त्याची बातमी केली.कोटयवधी रूपये खर्च करून आणलेल्या या हत्यारांची योग्य ती काळजी घेतली गेली नाही म्हणून जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई व्हायला हवी होती.तसं काही झालं नाही.उलट राष्ट्रीय संपत्तीचं होणारं नुकसान जगासमोर आणल्याबद्दल अकेला यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली गेली.ज्या ठिकाणी शस्त्रे ठेवली गेली होती तो परिसरात प्रतिबंधित क्षेत्र असल्याचं सांगत अकेला यांच्यावर ट्रेसपासिंगचा गुन्हा दाखल केला गेला.शिवाय 'ऑफिसियएल सिक्रेट अॅक्ट'सारखे गंभीर गुन्हे त्यांच्यावर दाखल केले गेले.या घटनेनं मिडियात मोठी खळबळ उडाली.सारे आर.आर.पाटील यांच्याकडं गेले.त्यानंतर सूत्रे हलली आणि अकेला यांच्यावरील खोटा खटला मागे घेतला गेला.

रचना खैरांचा विषय वरील दोन्ही प्रकरणापेक्षा वेगळा नाही.आधारचं महत्व सरकारनं नको तेवढं वाढवून ठेवलंय.बरं त्यालाही हरकत नाही पण आधारसाठी दिलेली माहिती गोपनीय राहिल याची तरी काळजी सरकारनं घेतली पाहिजे होती.ती घेतली गेली नाही.हे जेव्हा रचना खैरा यांच्या नजरेस आलं तेव्हा त्यांनी शोध पत्रकारितेचा आधार घेऊन व्यवस्थेलाच उघडं पाडलं.एका एजन्टामार्फत त्यांनी केवळ पाचशे रूपयांत एक सॉफ्टवेअर,लॉगइन आयडी,आणि पासवर्ड मिळविला.सॉफ्टवेअर लॉगइन केल्यानंतर त्यावर कोणताही आधार क्रमांक टाकला की,त्या क्रमांकाची संपूर्ण माहिती मिळू शकते.एवढंच नाही तर आणखी तीनशे रूपये दिल्यानंतर एजन्टानं रचना खैरा यांना आणखी एक सॉफ्टवेअर दिले.त्यातनं आधारची प्रिन्ट मिळू शकते.देशाला धक्का देणारी ही सारी माहिती समोर आल्यानंतर खरं तर युआयडीएआयनं या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींच्या मुस्क्या आवळायला पाहिजे होत्या.कारण आधारची माहिती लंपास करणारी एखादं-दुसरी व्यक्ती नव्हती किंवा नाही तर मोठे रॅकेट कार्यरत होते। हेच बातमीतुन दिसते। .विषयाचं महत्व लक्षात घेऊन युआयडीएआयनं तातडीनं पावलं उचलायला हवी होती.या यंत्रणेनं पाऊल उचलली पण गुन्हेगारांऐवजी गुन्हेगारी सुरू असल्याची बातमी देणाऱ्या पत्रकारावर गुन्हे दाखल कऱण्यासाठी.'अवैध मार्गानं पत्रकारानं आधारची माहिती मिळविली ,गुन्हेगारी कटात सामील होऊन कायद्याचं उल्लघन केलं' असा आरोप ठेवत त्यांच्यावर फसवणूक,फोर्जरीसारखे फौजदारी गुन्हे दाखल केले.आधार कायद्याच्या कलमांचाही त्यांच्याविरोधात वापर केला.मात्र ज्या एक लाखांवर लोकांनी आधारची माहिती पळविली आहे त्यांच्यावर कोणताही गुन्हा ही यंत्रणा दाखल करू शकलेली नाही.त्यामुळं या यंत्रणेतीलच काही 'कच्चे दुवे' या रॅकेटमध्ये सहभागी आहेत की,काय ? अशी रास्त शंका घेता येऊ शकते. रचना खैरा यांनी गोपनीय माहिती बेकायदेशीररित्या मिळविली हे कृत्य कायदा हातात घेणारे आहे हे कोणी अमान्य कऱणार नाही मात्र रचना खैरा आधार यंत्रणेच्या कार्यालयात जाऊन सनदशीर मार्गानं माहिती द्या असं म्हणाल्या असत्या तर त्यांना हवी असलेली माहिती मिळाली असती का ? नक्कीच मिळाली नसती.शोध पत्रकारिता करताना याच मार्गाचा अवलंब करावा लागतो.सरिन यांनी तो केला किंवा आता रचना खैरा यानीही केला.कायदा हातात घेणं हे गैर असलं तरी ते देश आणि समाजहितासाठी असल्यानं क्षम्यही आहे. .देशातील कोट्यवधी नागरिकांची माहिती अशा पध्दतीनं चोरीला जात होती आणि ती थांबविण्यासाठी एका पत्रकाराने प्रयत्न केला असेल तर त्यांनी पत्रकाराचे कर्तव्य पार पाडले आणि पत्रकारितेचा धर्मही प्रामाणिकपणे निभावला असे म्हणता येईल.त्यांनी सारी माहिती पुराव्यासह मांडली नसती तर ही बातमी खोटीच असल्याचा डांगोरा सरकारी यंत्रणेनं पिटला असता आणि माध्यमांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उभं केलं असतं.मात्र पुराव्यासह सारीच पोलखोल झाल्यानं आधारच्या व्यवस्थेत दुरूस्त्या करून आधार अधिक सुरक्षित कऱण्यासाठी नवी यंत्रणा उभारण्याची घोषणा सरकारला करावी लागली.नवी व्यवस्था कितपत परिपूर्ण असेल हे आजच सांगता येणार नसले तरी रचना खैरा यांच्या बातमीमुळं हे होतंय,याकडं दुर्लक्ष करता येणार नाही.

क्रमशः



# कोकणात वातावरण बदलाचा हापूसला फटका

- टिम "येवा कोकणात"



हापूस आंब्याला चांगल्या प्रकारे फुले येण्यासाठी १३ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी तापमान किमान सात दिवस असणे आवश्यक आहे. थंडी जर चांगल्याप्रकारे पडली नाही तर आंब्याला मोहोर चांगल्या प्रकारे येत नाही. आला तर तो उशिरा येतो. त्याचा फळ उत्पादनावर परिणाम दिसून आला आहे.

गेल्या काही वर्षांपासून कोकणातील हापूस आंब्यावर बदलत्या हवामानाचा परिणाम दिसून येत आहे. ज्यामुळे मोहोर वर्षे, फलधारणा, फळांची वाढ यावर विविध परिणाम दिसून येत आहे. आंबा मोहोर येण्याची प्रक्रिया ही बऱ्यापैकी क्लिष्ट आहे आणि ही प्रक्रिया निव्वळ एका घटकावर अवलंबून नाही. आंब्याचे झाड आणि वातावरण हे दोन्ही आंबा मोहोर येण्याला कारणीभूत आहेत. आंब्याच्या जातीपरत्वे आंब्याला मोहोर येतो. नैसर्गिकपणे विचार केल्यास हापूस आंब्याला एक वर्षाआड मोहोर येतो तर नीलम, रत्ना या जातींना दरवर्षी मोहोर येतो. हापूस आंब्याला जून काडीमधून मोहोर फुटतो. सुमारे एक वर्ष वयाच्या जून झालेल्या काडीतून हापूसला मोहोर येतो. याचा दुसरा अर्थ असा, की मोहोर येण्यासाठी आंब्याचे झाड सक्षम असावे लागते, तसेच पुरेसा कर्बोदकाचा साठा त्यामध्ये असावा लागतो.

हा कर्बोदकांचा साठा होण्यासाठी पानांद्वारे होणारी प्रकाशसंश्लेषण क्रिया महत्त्वाची ठरते. ही क्रिया चांगल्या प्रकारे झाली असल्यास फुले येण्यासाठी आवश्यक कर्बोदकांचा साठा झाडामध्ये होतो आणि अशा झाडांमधून मोहोर येण्याची शक्यता जास्त राहते. आंब्याच्या झाडामध्ये अनेक प्रकारची वाढनियंत्रके हे कार्यरत असतात. यापैकी जिबरॅलिक ॲसिड आणि मोहोर येणे याचा अत्यंत जवळचा संबंध आहे. झाडामध्ये म्हणजेच पाने व फांद्यांमध्ये जर जिबरॅलिनची पातळी जास्त असली, तर हापूस आंब्याच्या झाडामधून मोहोर येण्याची शक्यता अत्यंत कमी असते. जर जिबरॅलिनची पातळी कमी असली तर मात्र आंब्याला मोहोर येण्याची शक्यता दाट असते.

नैसर्गिकरीत्या हापूस आंब्याला जी एक वर्षाआड फळे येतात ती त्याचमुळे. जिबरॅलिनची पातळी ज्या वर्षी आंबे लागतात त्या वर्षी वाढते, पुढील वर्षी मोहोर अत्यल्प येतो अथवा येत नाही. ज्या वर्षी मोहोर कमी येतो अथवा येत नाही, त्या वर्षी जिबरॅलिनची पातळी कमी राहते. पुढील वर्षी आंब्याला मोहोर चांगला येतो. झाडाच्या या प्रवृत्तीवर मात करण्यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने पॅक्लोब्युट्रॉझॉल या संजीवकाची शिफारस केली आहे.

झाडाबरोबरच झाडाबाहेरील घटकदेखील मोहोर येण्यासाठी तितकेच आवश्यक आहेत. यातला सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे थंडी. हापूस आंब्याला चांगल्या प्रकारे फुले येण्यासाठी १३ अंश से. अथवा त्यापेक्षा कमी तापमान किमान सात दिवस असणे आवश्यक आहे. थोडक्यात, थंडी जर चांगल्याप्रकारे पडली नाही तर आंब्याला मोहोर चांगल्या प्रकारे येत नाही. आला तर तो उशिरा येतो.

थंडीबरोबरच पाण्याचा ताणदेखील तितकाच महत्त्वाचा आहे. पावसाळा संपल्यानंतर हा ताण झाडाला मिळण्यास सुरवात होते. जर पाऊस नियमित पावसाळा सोडून पुढेदेखील पडत राहिला, म्हणजे जर नोव्हेंबरपर्यंत पडत राहिला, तर आंब्याची मोहोर येण्याची प्रक्रिया रखडते व आंब्याला मोहोर उशिरा येतो.

काही वेळा आपल्याला असे दिसून येते, की पावसाळ्यात म्हणजे जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात ज्या वेळी भरपूर पाऊस सतत पडणे अपेक्षित असते त्या वेळी जर मोठा खंड पडला, म्हणजे पाऊस न पडता १५ ते २० दिवस जर सतत ऊन पडले तर अशा वेळेला या बागेमध्ये आंब्याला मोहोर यायला सुरवात होते. विशेषतः समुद्रानजीकच्या आंबा बागेमध्ये मोहोर अवकाळी येण्याची उदाहरण आढळतात. पाण्याचा ताण महत्त्वाचा आहे. जर पावसाळ्यानंतर आंब्याच्या झाडाला सतत पाणी मिळत गेले तर अशा आंब्याच्या झाडाला मोहोर उशिरा येण्याची दाट शक्यता असते.

कोकणामध्ये समुद्रालगत असलेल्या आंबा बागा उत्पन्नाच्या दृष्टीने आघाडीवर आणि सरस असतात असा एक समज आहे व तो बऱ्याच अंशी खरा आहे. याला कारण म्हणजे समुद्रावरून येणारा खारा वारा. समुद्रावरून येणारा वारा हा आपल्यासोबत क्षारांचे कण घेऊन येतो, हे क्षार आंब्याच्या पानांवर पडतात आणि त्यामुळे एक प्रकारचा ताण हा त्या झाडाला मिळतो आणि आंब्यामधून मोहोर येण्याच्या प्रक्रियेला मदत होते. हापूसच्या मोहोरण्यावर सातत्याने बदललेल्या हवामानाचा परिणाम होतो आहे.

मोहोर उशिरा आला तर फळधारणा उशिरा होते. सहाजीकच फळे काढणीसाठी उशिरा तयार होतात. हापूसचे वैशिष्ट्य म्हणजे लवकर बाजारात येणाऱ्या फळांना आकर्षक दर मिळतो तर उशिरा येणाऱ्या फळांना अन्य राज्यांमधून येणाऱ्या फळांशी स्पर्धा करावी लागते. परिणामी दर कमी मिळतो. काही वेळा उशिरा तयार होणारी फळे नियमित पावसाच्या अथवा मे महिन्यामध्ये येणाऱ्या अवेळी पावसामध्ये सापडतात. परिणामी या फळांचे नुकसान होते. या पावसामुळे वातावरणातील आर्द्रता वाढल्याने फळमाशीसारख्या किडींचे प्रमाणदेखील लक्षणीय प्रमाणात वाढते.

कोकणामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये फेब्रुवारी, मार्च महिन्यामध्ये पाऊस पडण्याचे प्रकार घडले आहेत. या वेळी उशिरा आलेल्या मोहोराची फळधारणा झालेली असते, तर आधीच्या मोहोराची फळे विकसित झालेली असतात. हा अवेळी पाऊस अल्प कालावधीसाठी म्हणजेच एखादा दिवस पडल्यास फारसे नुकसान होत नाही. अर्थात, या अवेळी पावसाच्या वेळी सोसाट्याचा वारा असल्यास फळे गळून पडतात; मात्र हा पाऊस दीर्घ कालावधीसाठी म्हणजेच दोन दिवसांपेक्षा जास्त काळ राहिल्यास फळांवर डाग पडतात. अशा वेळी करपा रोगाचे प्रमाण वाढते.

आंब्याला मोहोर येणे त्यापासून फळधारणा होण्याच्या कालावधीमध्ये बिगर हंगामी पाऊस पडल्यास आंबा पिकाची मोठी हानी होते. अवेळी पडलेल्या पावसामुळे अँथ्रॅकनोज या रोगाच्या प्रादुर्भावामुळे फळांवर डाग पडतात. फळे गळून पडण्याचे प्रमाण वाढते तसेच उर्वरित फळांना कमी दर मिळतो. पावसामुळे वाढलेल्या आर्द्रतेचे प्रमाण दीर्घकाळ राहिल्यामुळे तुडतुड्यांचा प्रादुर्भाव वाढून मोठ्या प्रमाणावर फळगळ होऊ शकते. गेली दोन वर्षे कोकणामध्ये सर्वसाधारण सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला आहे. त्याचप्रमाणे हा पाऊस जास्त कालावधीसाठी देखील पडला आहे. या पावसामुळे पावसाळ्यानंतर पालवी येण्याचे प्रमाण वाढले आहे. जून फांद्यांमधून ज्या ठिकाणी मोहोर येणे अपेक्षित असते अशा ठिकाणी ही पालवी येते. ही पालवी किमान तीन महिने वयाची झाल्यानंतर त्यातून मोहोर येण्याची शक्यता असते. पॅक्लोब्युट्रॉझॉलचा वापर केला असल्यास या पालवीतून मोहोर येण्याची शक्यता दाट असते, परंतु पॅक्लोब्युट्रॉझॉलचा वापर केला नसल्यास अशा पालवीतून मोहोर येणे बऱ्याच प्रमाणात थंडीवर अवलंबून असते. सततच्या व जास्त पडणाऱ्या पावसामुळे रायझोक्टोनिया व बॉट्रीओडिप्लोडिया या बुरशीजन्य रोगामुळे फांदीवर रोगाचा प्रादुर्भाव कोकणात आढळून येत आहे.

सर्वसाधारणपणे कोकणातील पाऊस सप्टेंबर महिन्यामध्ये संपतो. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये उष्णता वाढते. हवामानातील आर्द्रता कमी होते. जमिनीमधील ओलावा तसेच पाण्याची पातळी कमी होते. नोव्हेंबर महिन्यापासून थंडी सुरू होते आणि हापूस मोहोरतो. या सर्वसाधारण परिस्थितीत पूर्ण वाढलेल्या हापूसच्या एका झाडावर सुमारे १००० फुलांचे तुरे येतात. या प्रत्येक तुऱ्यामध्ये १००० ते २००० फुले असतात.

ही फुले नर व संयुक्त असा दोन्ही प्रकारची असतात. हापूस आंब्यामध्ये संयुक्त फुलांचे प्रमाण हे सर्वसाधारणपणे ११ ते १३ टक्के असते. उर्वरित फुले नर असतात. इतर जातीमध्ये हेच प्रमाण रत्ना २७ टक्के, केशर ३० टक्के, सिंधू ३५ टक्के तर गोवा मानकूर २५ टक्के असते. आंब्याचा मोहोर येण्यासाठी १३ अंश से.पेक्षा कमी तापमान आवश्यक आहे. मात्र मोहोर आल्यानंतर जर सातत्याने तापमान कमी राहिले तर मात्र ते धोकादायक ठरते. मोहोरावस्थेत असताना सततच्या कमी तापमानामुळे संयुक्त फुलांचे प्रमाण खालावते. एकूण संयुक्त फुलांपैकी २०टक्के फुले अपूर्ण काही भाग नसल्याने गळून पडतात. २० टक्के फुले कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे तर उर्वरित ४० ते ५० टक्के फुले प्रभावी परागीभवन न झाल्याने गळून पडतात.

दीर्घकाळापर्यंतच्या कमी तापमानामुळे परागीभवनासाठी आवश्यक कीटकांचे प्रमाण देखील कमी होते. त्याचा परिणाम परागीभवनावर होतो. कमी तापमानामुळे परागीभवन होऊन फळधारणा झालेल्या फळांची वाढ संथगतीने होते. फळ पक्व होण्यासाठी आवश्यक तापमान जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत आंबा फळे पक्व होत नाहीत. आवश्यक तापमान जातीपरत्वे बदलते. गेल्या दहा वर्षांमध्ये वातावरणातील बदलामुळे देशाच्या विविध किनारपट्टीच्या प्रदेशामध्ये आंब्याच्या उत्पादकतेमध्ये लक्षणीय घट झालेली दिसून येते.

# अवकाश परी "कल्पना चावला"



बालामित्रानो अंतराळात जाणारी भारतीय वंशाची पहिली महिला अंतराळवीर अशी ख्याती असणा-या कल्पना चावला यांची नुकतीच पुण्यतिथी झाली. त्यांचा जन्म १ जुलै १९६१ रोजी हरियाणा या गावी झाला. कराड ते युनाइटेड हा प्रवास म्हणजे "विश्वची माझे घर" सिद्ध करणारी ती या अंतराळवीरेची अखंड यात्रा होती. भारतातील शिक्षणानंतर एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ मध्ये त्यांनी डॉक्टरेट मिळवली. अंतराळातील तिची पहिली सफर व त्यानंतरचा मिशन विशेषज्ज्ञ म्हणून त्यांनी एस.टी.एस. ८७ वर काम केले. अवकाशात त्यांनी ३७६ तास व ३४ मिनिटे प्रवास केला. भारतासाठी ती एक अभिमानाची गोष्ट ठरली. १ फेब्रुवारी २००३ या दिवशी अवकाशातून पृथ्वीवर येणा-या कोलंबिया अवकाशयानाचा स्फोट झाला, या स्फोटामुळे कोलंबियाचे अक्षरश: तुकडे तुकडे झाले, यानामध्ये असलेल्या कल्पना चावला आणि अन्य अंतराळवीरांचा दुर्दैवीमृत्यू झाला.

शिक्षण: कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण गावातील टागोर बाल निकेतन विद्यालयात झाले.कल्पना चावला हुशार असल्याने त्या नेहमी पहिल्या पाच नंबरात असत. शिक्षकांच्या ही त्या लाडक्या झाल्या होत्या. त्यांचा स्वभाव अतिशय साहसी होता. त्या कराटे शिकल्या.भरतनाट्यम या कला प्रकारातही त्यांनी नैपुण्य प्राप्त केले. संजय हा त्यांचा भाऊ कर्नालच्या फ्लाईंग क्लबमध्ये जात होता. तेव्हा कल्पना यांनाही तेथे जावे असे वाटत. पण जेव्हा वडिलांनी नोंदणी अर्ज दिला तेव्हा अधिकाऱ्यांनी कल्पना स्त्री आहे, ती वैमानिक होणे योग्य वाटत नाही असे सांगितले. तसेच त्यांनी कल्पना यांना या वेडापासून परावृत्त करण्यास सांगितले. पंजाब विद्यापीठातून त्यांनी १९८२ साली एरोनॉटिकल अभियांत्रिकी पदवी घेतली. पुढे १९८४ मध्ये अर्लिंगटन टेक्सास विद्यापीठातून एरोनॉटिकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण घेऊन, त्यांनी कॉलोरॅडो विदयापीठांतून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८मध्ये डॉक्टरेट मिळवली.

कार्य: १९८८ मध्ये त्यांनी नासा एम्स रिसर्च सेंटर मध्ये Vertical/Short Takeoff and Landing वर संगणकीय द्रव प्रेरक शक्ती ( Computational fluid dynamics (CFD) ) चे संशोधन केले. १९९३ मध्ये त्या ओवरसेट मेथड्स व्हाईस प्रेसिडेंट आणि संशोधक म्हणून रुजू झाल्या. १९९१ मध्ये अमेरिकेचं नागरिकत्व स्वीकारल्यावर त्यांनी नासा ऍस्ट्रोनात कॅम्प मध्ये मध्ये भरती होण्याचा अर्ज केला होता. त्या मार्च १९९५ मध्ये कॉर्पस मध्ये निवडल्या गेल्या व १९९६ मध्ये त्यांची १५ व्हा अंतराळवीर समूहात उड्डाणासाठी निवड झाली. विना गुरुत्वाकर्षणाच्या पोकळीत प्रवास करताना त्या म्हणाल्या होत्या “तुमची बुद्धिमत्ता हेच तुम्ही आहेत” (“You are just your intelligence”). त्यांनी १०६.७ लाख किमी ३७६ तास व ३४ मिनिटे प्रवास केला, जो पृथ्वीच्या परिघाच्या २५२ पट आहे.

विवाह: शैक्षणिक काळात कल्पना यांची जीन पियरे टॅरिसन (जेपी) या युवकाशी ओळख झाली. जेपी यांचा विमानाचे प्रशिक्षण देण्याचा व्यवसाय होता. त्यांच्याकडून कल्पना यांना विमान शिकता आले. तसेच स्कूबा डायव्हिंग हा रोमांचक खेळ प्रकारही त्यांना जेपी यांच्याकडून शिकता आला. लहानपणापासून विमान शिकण्याचे स्वप्न अमेरिकेत काही दिवसातच पूर्ण झाले. जेपी हे मुळचे फ्रेंच होते. त्यांचे मैत्रीचे नाते प्रेमात बदलले व १९८४ साली जेपी व कल्पना यांचा विवाह झाला. लग्नानंतर त्यांना विमान नीट उडवण्यास येऊ लागले

कराडचे कल्पना चावला विज्ञान केंद्र: कल्पना चावला यांच्या मृत्यूने व्यथित झालेल्या कराडच्या टिळक ' हायस्कूलमधील संजय पुजारी नावाच्या विज्ञान शिक्षकांनी कल्पना चावलांच्या वडिलांच्या, बनारसीलाल चावला यांच्या परवानगीने कराडमध्ये कल्पना चावला विज्ञान केंद्र सुरू केले आहे. हे केंद्र मुलांमध्ये विज्ञानाचा प्रसार करून त्यांना विज्ञानाची गोडी लावण्याचे कार्य करते.

मुलाला पडणार्या प्रश्नांची उत्तरे त्याला प्रत्यक्ष कृतीमधून शोधता आली पाहिजेत, विज्ञानाच्या निकषांवर त्याला विचार करता यायला पाहिजे, प्रयोग करता आले पाहिजेत, अशी अनेक उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून उभे केलेले हे 'कल्पना चावला विज्ञान केंद्र', संजय पुजारी यांनी १ जुलै २००६ या दिवशी स्थापन केले.

कल्पना चावला विज्ञाना केंद्राचे कार्य कसे चालते, हे पाहण्यासाठी कल्पनाचे वडील बनारसीलाल चावला यांनी केंद्राला भेट दिली होती. त्यांनी केंद्राचे काम पाहून मोठी देणगीसुद्धा दिली. कल्पना चावला यांच्या भगिनी सुनीतादीदी यांनीही ५० हजार रुपये किमतीची पुस्तके या केंद्रासाठी दिली. भारतात या नावाचे हे एकमेव केंद्र असेल अशी ग्वाही बनारसीलाल यांनी दिली.

या विज्ञान केंद्राचे स्वतंत्र ग्रंथालय आहे. ग्रंथालयात निसर्ग, पर्यावरण, विज्ञानाच्या विविध मूलभूत शाखा यांविषयीची अनेक पुस्तके, विश्वकोश, चरित्रे, विज्ञानाशी संबंधित सीडी आणि डीव्हीडी असा मोठा संग्रह मुलांना संदर्भासाठी उपलब्ध करून दिला जातो.

'शाळेबाहेरची शाळा' असे या केंद्राच्या कार्याचे स्वरूप आहे. हसतखेळत आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विज्ञानाचे शिक्षण देणे हे कल्पना चावला विज्ञान केंद्राचे धोरण आहे. या दृष्टीने केंद्राचे समन्वयक म्हणून काम करणारे पुजारी सर आणि त्यांना मदत करणारे त्यांचे इतर शिक्षक सहकारी सतत प्रयत्नशील असतात.

## चित्र रंगवा आणि पाठवा

बाजूला दिलेले चित्र रंगवून दहा दिवसांत पोस्टाने किंवा कार्यालयात आमच्याकडे पाठवा.

लवकरात लवकर पाठवणाऱ्या आणि सगळ्यात चांगल्या रंगवलेल्या चित्राला पुढच्या अंकात प्रसिद्धी मिळेल. (*अटी लागू.)

येवा कोकणात
फ्लॅट नं. एस ३, २ रा मजला,
अशोक रेसिडेन्सी, अरोमा
हॉटेल जवळ, शिवाजी नगर,
कणकवली - ४१६६०२

संपर्क:
७०३८२८२३१९



**चित्र रंगवा आणि पाठवा**

नाव: ______________________

शाळेचे नाव: ______________________ इयत्ता: __________

पत्ता: ______________________

फोन नंबर: ______________________



# 'अखंड' एका नव्या पर्वाची सुरवात..

◀ पान १६ वरून

#पुणे येथील दुसरे संमेलन कसे असेल

शनिवार पेठ पुणे येथील अहिल्यादेवी शाळेजवळील सुदर्शन रंगमंच येथे हे दुसरे अखिल भारतीय चित्र शिल्प कला संमेलन होत आहे. अखंड लोकमंच सिंधुदुर्ग आणि महाराष्ट्र कल्चरल सेंटर, सुदर्शन रंगमंच यांच्या सहयोगाने ९,१० आणि ११ फेब्रुवारी असे तीन दिवस हे संमेलन आहे. गतवर्षी पहिले संमेलन कणकवली येथे झाले होते. याकला संमेलनाचे उद्घाटन ९ फेबुरवारीला सकाळी १० वाजता माधुरीताई पुरंदरे यांच्याहस्ते होईल. तर प्रमुख पाहुणे किरण नगरकर आणि डॉ. जयंत पंडित असणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमानंतर दुपारी १.३० ते ३ या वेळेत राजू सुतार (पुणे) आणि श्रीकांत कदम (पुणे) हे कलासंवाद साधणार आहेत. दुपारी ३.३० ते ४.३० या वेळेत राम पंडित आणि गौरी पंडित यांचे गायन होणार आहे. दुपारी ४.३० ते ५.३० या वेळेत मानस गोसावी यांचे मोहनवीणा वादन तर मृगेंद्र मोहाडकर यांचे बासरीवादन होईल. दुसर्याम सत्रात सायंकाळी ६ ते ८ या वेळेत बडोदा येथील दीपक कन्नल हे कलारसिकांशी कलासंवाद साधार आहेत. तर रात्री १० नंतर चित्रपट सादर होणार आहे.

शनिवारी (ता.१०) पहिले सत्र सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होईल. यात पुणे येथील संदीप देशपांडे, अर्चना पेंडसे आणि अमर पाटील हे कलासंवाद साधणार आहेत. तर दुपारी ४ ते ५ या वेळेत भाग्यश्री पांचाळे आणि सुनील बोरगावकर यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. दुसर्यास सत्रात सायंकाळी ६ ते ८ या वेळेत पुणे येथील समर नखाते हे कलासंवाद मध्ये सहभागी होणार आहेत. तर रात्री १० नंतर चित्रपट होणार आहे.

रविवारी चित्र शिल्प आणि कला संमेलनाचा समारोप होणार आहे. यात पहिल्या सत्रात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पुणे येथील सतीश काळे आणि अभिजित रणदिवे हे कलारसिकांशी कलासंवाद साधणार आहेत. तर दुपारच्या सत्रात सायंकाळी ४ ते ५ या वेळेत मानसकुमार यांचे व्हायोलिन वादन होईल. त्यांना मनीष मदनकर हे तबलासाथसंगत करणार आहेत. दुसर्या सत्रात सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत ज्येष्ठ आणि नामवंत चित्रकार प्रभाकर कोलते हे कलारसिकांशी कला संवाद साधणार आहेत.

या संमेलनाच्या तिन्ही दिवशी चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात एफ. एन. सुझा, एन. एस. बेंद्रे, तय्यब मेहता, किशन खन्ना, के. एच. आरा, राम कुमार, एस. एच. रझा, सदानंद बाकरे, के. के. हेब्बर, जॉन तुन्सेन, राजू सुतार, प्रकाश वाघमारे, सतीश काळे, अमर पाटील, हेमंत ढाणे, श्रीकांत कदम, नितीन हडप, संदीप सोनवणे, वैशाली ओक आणि सई देशपांडे या नामवंत चित्रकारांच्या चित्रांचा समावेश असणार आहे.




श्रमिक मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून अखंड संस्थेने घेतलेल्या कातकरी आदिवासी परिषदेला संबोधित करताना संस्थेचे अध्यक्ष नामानंद मोडक आणि उपस्थित मान्यवर



संस्थेच्या वतीने कातकरी वस्तीवर स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनी तिरंगा फडकवला जातो



श्रमिक मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून अखंड संस्थेने घेतलेल्या कातकरी आदिवासी परिषदेला उपस्थित असलेले कातकरी बांधव

# 'निवती' एक शिवकालीन किल्ला


- टिम "येवा कोकणात"

सिंधुदुर्ग किल्ल्याच्या दक्षिणेला, मालवण पासून १० किमी व वेंगुर्ल्यापासून १५ किमी सागरी अंतरावर असलेल्या निवती गावातील समुद्रात शिरलेल्या डोंगरावर शिवाजी महाराजांनी निवतीचा किल्ला बांधला. मालवणजवळ असलेली कर्ली खाडी ते वेंगुर्ला ह्या सागरी भागावर निवतीच्या किल्ल्यातून लक्ष ठेवता येते. सिंधुदुर्ग किल्ला बांधल्यानंतरच्या काळात शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला. या किल्ल्याचा ताबा पुढे सावंतवाडीकर सावंतांकडे गेला. १७४८ साली पोर्तुगिजांच्या पदरी नोकरीस असलेल्या इस्माईल खानने निवतीवर हल्ला करुन तो जिंकून घेतला. १७८७ साली करवीरकर छत्रपती व सावंत यांच्यात झालेल्या लढाईत करवीरकरांनी किल्ला जिंकला. १८०३ मध्ये गडाचा ताबा परत सावंतांकडे आला. ४ फेब्रुवारी १८१८ रोजी इंग्रजांनी हा किल्ला जिंकून घेतला.

गडावर जाण्यासाठी प्रवेशद्वारा पर्यंत पंधरा-वीस शिवकालीन दगडी पाय-या आहेत. प्रवेश द्वारापाशी डाव्या हाताला ढासळलेला फुटका बुरूज गडाची साक्ष देत उभा आहे. काळाच्या ओघात दरवाजा गडप झालेला आहे.

डाव्या हाताला चि-यांची तटबंदी आहे. तटबंदीवर वड, पिंपळाची प्रचंड झाडं वाढलेली आहेत. मधेमधे तटबंदी कोसळलेली आहे. आश्चर्य म्हणजे उजव्या हाताला कातळात खोदून काढलेला खंदक आहे. खंदक चांगलाच खोल आहे. पण गड दुर्लक्षित झाल्यामुळे खंदकात सर्वत्र झाडं, झुडुपं, वेलींची वाढ झालेली आहे. खंदक चांगलाच लांब, रुंद व दूरवर पसरलेला आहे. निमुळत्या पायवाटेवरून खंदक ओलांडून बालेकिल्ल्यात प्रवेश करता येतो. बालेकिल्ल्याचं प्रवेशद्वार नष्ट झालेलं आहे.पण बालेकिल्ल्याच्या भिंती आणि तटबंदी आजही शाबूत आहेत, तसंच प्रेक्षणीयही आहेत. चारही बाजूंच्या भिंतींमध्ये मोठमोठे अर्धगोलाकार कोनाडे आहेत. मधेमधे छोटे, छोटे झरोके ठेवलेले आहेत. बालेकि








ल्ल्या मधील आवार मात्र चांगलं प्रशस्त व मोकळं आहे. पश्चिम दिशेची तटबंदी मात्र ढासळलेली आहे. याच दिशेला चोरदरवाजा आहे. पण दगड, माती पडून खूप झाडी वाढल्यामुळे वाट बंद झाली आहे. येथे खाली अथांग अरबी समुद्र पसरलेला आहे. समुद्रावरून येणारा भन्नाट गार वारा अंगाला सुखावतो. गडाच्या मधोमध एक अर्धा फुटलेला व एक अखंड गोलाकार भरीव बुरूज पाहण्यास मिळतो.

गडाच्या मधोमध या बुरुजांचं काय प्रयोजन होतं ते समजण्यास मार्ग नाही. इथून पुढे उत्तर दिशेला पश्चिम टोकावर अजून एक गोलाकार भरीव बुरूज एकांडय़ा शिलेदारासारखा आजही गडाचं रक्षण करत उभा आहे. इथून खाली भोगवे बीचचा अप्रतिम सागरकिनारा पाहून आपलं भान हरपून जातं. समोर निळाशार अथांग पसरलेला सागर, खाली निर्मनुष्य भोगवेचा सागरकिनारा, किना-यावर नारळ, पोफळीची झाडं सुसाट वा-यावर डोलताना पाहून भान हरपून जातं.

निवती गड तसा छोटा आहे. उंचीनेही छोटा आहे. पण छान आहे. गड पाहण्यास अर्धा, पाऊण तास भरपूर होतो. गडावर अजूनही बरेच अवशेष असावेत. पण बेसुमार वाढलेल्या गवतात, झाडाझुडपात सारं गडप झाल्यासारखं वाटतं. फक्त एक बाब खटकते ती म्हणजे गडावर पाण्याचे टाक, तलाव पाहण्यास मिळत नाहीत. पिण्याच्या पाण्याची काय योजना होती ते कळण्यास मार्ग नाही. कारण पाण्याविना गड वसत नाही. बुजलेल्या, नष्ट झालेल्या टाकांचा शोध घ्यायला हवा.

कार्ली नदी ज्या ठिकाणी सागराला मिळते, त्या खाडीच्या दक्षिणेला समुद्रालगत एका टेकाडावर शिवाजी महाराजांनी हा गड उभारलेला आहे. या गडासंबंधी जास्त काही ऐतिहासिक माहिती गडावर पाहायला मिळत नाही. शिवकाळानंतर हा किल्ला १८ व्या शतकामध्ये सावंतवाडीच्या सावंतांकडे होता. ४ डिसेंबर १७४८ रोजी पोर्तुगीजांनी निवतीवर हल्ला चढवला. पोर्तुगीजांच्या पदरी नोकरीस असलेल्या इस्माइल खान नावाच्या कॅप्टनने शौर्याची कमाल करून सावंतांकडून हा किल्ला जिंकून घेतला.

काही वर्षानंतर निवतीचा किल्ला पोर्तुगीजांकडून सावंतांनी पुन्हा जिंकून घेतला. १७८७ मध्ये मोच्रेल प्रकरणावरून करवीरकर व सावंतवाडीकर यांच्यामध्ये लढाई झाली. त्या वेळी करवीरच्या छत्रपतींनी इतर किल्ल्यांसोबत निवतीचा किल्ला जिंकून घेतला. १८०३ मध्ये निवती पुन्हा सावंतांकडे आला. शेवटी महाराष्ट्रातल्या इतर किल्ल्यांसोबत १८१८ मध्ये इंग्रज अधिकारी जनरल कीर याने निवती किल्ला ४ फेब्रुवारी रोजी लढाई न करताच जिंकून घेतला.

<u>किल्याच्या बाजूला काय आहे ?</u>

किल्ल्यातून समुद्राच्या दिशेला चालत गेल्यावर गडाच्या पश्चिम टोकावरुन पायथ्याला समुद्रात असलेले नारींगी रंगाचे खडक पहायला मिळतात. याच ठिकाणाहून उजव्या बाजूस समोर अरबी समुद्र व दूरवर वेंगुर्ल्याचे बर्न्ट रॉक्स हे दिपगृह दिसते. येथे एक खड्डा व त्यात उतरणार्या कातळात खोदलेल्या पायर्या पाहायला मिळतात. येथे खोदीव टाक असण्याचा संभव आहे. निवती किल्ल्यावर आपल्याला पाण्याची व्यवस्था कुठेही दिसत नाही, ती किल्ल्याखाली केलेली आहे त्याला स्थानिक लोक 'शिवाजीची तळी' या नावाने ओळखतात. ती पाहाण्यासाठी किल्ला उतरतांना सरळ रस्त्याने गावात न जाता, उजव्या बाजूला समुद्राकडे उतरणार्या रस्त्याने खाली उतरावे. येथेच 'शिवाजीची तळी' नावाची पाण्याची टाकी आहेत. पुन्हा मुळ रस्त्याने निवती किनार्यावर गेल्यास छोटीशी पुळण व त्यावरुन समुद्रात घुसलेला २० फूटी खडक पाहायला मिळतो. याला 'जुनागड' म्हणतात. पुळणीच्या बाजूने त्यावर चढता येते. निवती पासून ८ किमी वरील परूळे गावात वेतोबा मंदीर संकुल आहे. त्यातील प्रमाणबद्ध कोरीव मूर्ती व वीरगळ पहाण्यासारखे आहेत.



# वीरांची वीर गाथा

— किशोर राणे

वीरांच्या शौर्यगाथांचा इतिहास नवसमाजाला धैर्याची उर्मी देतो. 'जो देश अपने शहीदोंको भुला देता है, वह जीवित नही रहता।' असे इतिहास तज्ज्ञ सांगतात.

इतिहासाची दिंडी येथून गर्जत गेली पुढे
पालखीतल्या मानक-यांस्तव दुमदुमले चौघडे
त्या सर्वाची राख अजूनी, धुमसत आहे या स्थळी
जिथे न पणती, जळे पडे वा सुमनांची पाकळी
त्या राखेला नकोत मुजरे, नकोत माळा-तुरे
अरे आठवणींची एक जाग, तुझ्या हृदयामधली पुरे

वीरांच्या शौर्यगाथांचा इतिहास नवसमाजाला धर्याची उर्मी देतो. 'जो देश अपने शहीदोंको भुला देता है, वह जीवित नही रहता।' असे इतिहास तज्ज्ञ सांगतात. कोकणात मात्र इतिहासाबाबत कमालीचा निरुत्साह आहे. या मुलखातील लढवय्यांचा इतिहास मोठा आहे. जे-जे संकट येईल त्याला धैर्याने तोंड देत आपले शौर्य गाजवणा-या येथील वीरांचा इतिहास मोठा आहे. शिवशाहीत आणि त्यापूर्वीही त्यांनी अनेक पराक्रम केले आहेत.

इंग्रजाचे राज्य असतानाही या भूमीतील लढवय्यांनी त्यांना जसे जेरीस आणले तसेच भारताची अस्मिता दाखविण्यासाठी पहिल्या आणि दुस-या महायुद्धात सैन्य दलातून मोठी कामगिरीही केली. इंग्रजांनी कोकणच्या युद्धवीरांचे शौर्यस्तंभ उभे केले, स्वातंत्र्यानंतर हुतात्मा स्मारके उभी करण्यात आली. परंतु आज या स्मारकांची स्थिती बिकट आहे.

इंग्रजांनी येथे केलेले बांधकाम असो, नाही तर सोडलेल्या पाऊलखुणा त्यांचे रेकॉर्ड आजही इंग्लंडमध्ये पाहायला मिळते. चार वर्षापूर्वी महामार्गावर बांधलेल्या पुलांना १०० वर्षे झाली म्हणून भारत सरकारला कळविणारे ब्रिटिश एकीकडे आणि दुसरीकडे भग्नावस्थेत जाणा-या स्मृतिस्तंभांबाबत आमची असणारी अनास्था.. 'तवं शौर्याला एक अंश दे, तवं धर्याला जरा स्पर्श दे', असं म्हणावं लागतं आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर हा इतिहास जागृत होतो आहे आणि कोकणची लाल माती आणखीनच उजळते.

आम्ही इतिहासप्रेमी भारतीय आणि इतिहासप्रेमी युरोपियन यांच्यातील विसंगती प्रकर्षाने जाणवते. इतिहास घडवत असतानाच त्याची नोंदही तेवढय़ाच प्रगल्भपणे युरोपियन मंडळींनी केली. आमच्या इतिहासाची जाणीव त्यांनी ठेवली. पण आम्ही मंडळी आमच्या इतिहासाचे पुरावे, शौर्याच्या गाथा नष्ट करत आहोत, अगदी बिनधास्तपणे, कसलाही किंतू मनात न बाळगता.. कोकणची शौर्यगाथा शिवकालापूर्वीपासून मुद्रित आहे. परशुरामाचा इतिहास जगाला ज्ञात आहे. कोकणच्या भूमीचा निर्मितीकार समजल्या जाणा-या परशुरामाचाच वारसा शौर्यातून कोकणची मंडळी चालवत आहेत.

ज्यावेळी माहिती-तंत्रज्ञानाचा आवेग एवढा वाढला नव्हता, पत्रसंदेश हेच माध्यम होते, तेव्हा इंग्लंडमध्ये कोकणच्या शूरवीरांची गाथा नोंदली गेली होती. शिवकालात गाजवलेले शौर्य, निर्माण केलेल्या कोकणातल्या इतिहासाच्या पाऊलखुणा युरोपात जपल्या जात आहेत. याची या भूमीत कोणतीही नोंद नाही.

लंडनच्या हुतात्मा स्तंभावर महायुद्धात धारातीर्थ पडलेल्या कोकणातील शूरवीरांची नावे कोरली गेली आहेत. लंडनची सफर करण्यासाठी गेलेल्या भारतीयांना मराठी योद्धय़ांची नावे वाचून हृदय भरून येते. ज्यांच्या शौर्याची पताका विस्मृतीत जाऊ न देता सातासमुद्रापार नावे कोरली गेली, त्या योद्धय़ांची माहितीही मातृभूमीला नाही, हे दुर्दैवच आहे. पहिल्या आणि दुस-या महायुद्धात कोकणच्या वीरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. परदेशातील शत्रूला केवळ चितपटच केले नाही, तर पळता भुई थोडी केली.

१९१४ ते १९१९ दरम्यान झालेल्या पहिल्या महायुद्धाने जगभरात मोठी उलथापालथ घडविली. हे युद्ध मुख्यत: युरोपमध्ये दोस्त राष्ट्रे फ्रान्स, रशिया, इंग्लंड नंतर इटली आणि अमेरिका विरुद्ध जर्मनी, हंगेरी, ऑस्ट्रिया, ओटोमान अशा राज्यांमध्ये भडकले होते. भारत या महायुद्धात प्रत्यक्ष उतरला नसला तरी, इंग्लंडमुळे ओढला गेला.

इंग्लंडच्या आघाडीच्या सैन्यात भारताचे लाखो वीर होते आणि त्या वीरांचे नेतृत्व करत होते, कोकणचे धैर्यशील बांधव. जे तळहातावरच शौर्य घेऊन वावरत होते. भीती त्यांना माहितीच नव्हती. जर्मनीच्या सैन्याला सळो की पळो करून सोडताना, कोकणच्या काटकपणाने ब्रिटिश अचंबित झाले होते.

दिला शब्द मोडणार नाही, मोडेन पण वाकणार नाही, ही कडवी नीती जोपासणा-या कोकणच्या बांधवांना ब्रिटिशांनी या सैन्यात प्राधान्याने भरती केले. काहींना सक्तीने सातासमुद्रापार नेले. पण एकदा का शब्द दिला, तर मग मोडायचा नाही. यामुळे ब्रिटिशांच्या सैन्यातही भारताचे वर्चस्व त्यांनी दाखविले. कोकणच्या अनेक गावातील बांधवांनी पहिल्या महायुद्धातील बहुतांश लढायांमध्ये देदीप्यमान कामगिरी केली. त्याची नोंद ब्रिटिश सरकारने कसोशीने जपली आहे.

सिंधुदुर्गात तरंदळे, नाटळ, शिवडाव, सरंबळ, साळगाव, कलंबिस्त, मालवण जेटीवर या स्मृती जागविणारे स्तंभ सुमारे ८० वर्षापूर्वी बांधले गेले. त्यापासून हे स्तंभ जसे उभे तसेच आहेत. सिंधुदुर्गातून प्रत्यक्ष महायुद्धात किती जवान सहभागी झाले होते याची नोंद मिळत नसली तरी उपलब्ध कागदापत्रानुसार सुमारे ३ हजार जवानांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला असल्याच्या अनुमानापर्यंत आपण पोहोचतो.

अलीकडे या स्तंभावर कुणी आपली नावे कोरण्याचा प्रयत्न करतो आहे, तर कुणी ढेकळांचे खेळ खेळतो आहे. ज्या-ज्या गावात हे शौर्यस्तंभ उभे आहेत, त्या गावातील मंडळींना त्याचा इतिहास माहीत नाही. आपल्या गावातील वीरांची नावे त्यांना ज्ञात नाहीत. तसा दस्तऐवजही गाववासीयांकडे उपलब्ध नाही. नव्या पिढीला असे स्तंभ का उभे केले गेले, याबद्दल कमा लीचे अज्ञान आहे.

▶



# वीरांची वीर गाथा

इंग्रजांची हकालपट्टी करण्यात आली. देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यासाठी आहुती देणा-या हुतात्म्यांची स्मारके उभी करण्यात आली. मात्र या स्मारकांबाबतचे पावित्र्य टिकविणे आम्हाला जमले नाही. गावागावात उभी असणारे हे स्मृतिस्तंभ आता बापुडवाणे आहेत. एक मात्र निश्चित की या स्मृतिस्तंभांचे ब्रिटिशकालीन बांधकाम गेली अनेक पावसाळे तसूभरही हललेले नाही.

अनेक लढवय्यांनी इतिहास घडविला, मात्र आपण ज्यांच्या गुलामगिरीत आहोत त्यांच्यासाठी काम करणे म्हणजे गुलामांप्रमाणेच आपले काम आहे. अशी भावना येथील प्रत्येक लढवय्याच्या मनात खितपत होती. पराक्रम गाजवला, कोणासाठी शत्रूसाठीच ना अशी त्यावेळी लोकभावना होती. मात्र आपले कर्तव्य पूर्ण केल्यानंतर ब्रिटिशांना त्याच दमदारपणे आम्ही तुमचे गुलाम नाही आणि आमच्या देशावर तुम्ही सत्ता करू शकत नाही असे त्यांनी ठामपणे सांगितले. यामुळे स्वातंत्र्यसैनिकांचाही या भूमीला इतिहास मोठा आहे.

स्वातंत्र्यासाठी प्राण हातावर घेऊन झुंजणा-या सैनिकांची गाथा सांगावी तेवढी थोडीच आहे. ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना मानाचा मुजरा करताना या बहाद्दूर सैनिकांमध्ये वेंगुर्ला तालुक्यातील शिवराम सखाराम गावडे, श्रीपाद बाळकृष्ण नाईक, तुकाराम भिकाजी गावडे, वसंत शंकर करंगुटकर, सावळाराम साबाजी गावडे, सदाशिव विष्णू मांगले, श्रीकृष्ण सखाराम सौदागर, विष्णू सोनू मुंडये, यशवंत गणेश ठाकूर, अच्युत यशवंत सामंत, वासुदेव सदाशिव कुळकर, कृष्णा पुंडलिक भाटकर, बाळकृष्ण शिवराम पडवळ, विठ्ठल बाळा हुले, वैकुंठ शिवराम पडवळ, वसंत विठ्ठल नाईक सावंतवाडी- विठ्ठल भाऊराव वाळके, शेख दाऊद, शेख युसूफ, शिवराम विष्णू नाटेकर, भास्कर गोविंद शिरसाट, तुकाराम रघुनाथ नेवगी, पांडुरंग गोपाळ मिसाळ, मारुती चंद्रोबा चिटणीस, एकनाथ लक्ष्मण जोशी, नारायण सोयिरोबा मिसाळ, श्रीपाद राजाराम सुकी, महादेव लक्ष्मण बांदेकर, कृष्णा भिकाजी राऊळ, केशव गोविंद सुतार, खेमा न्हानू परब, रामकृष्ण राजाराम सुकी, रामा अर्जुन परब, महादेव गणू सावंत, चंदू हरी नाईक, कृष्णा बाबाजी मुंज, न्हानू मायबा सानम, विश्राम आत्माराम कानसे, साबाजी निळू सावंत, सखाराम बी. गावडे, भिवा काळू सावंत, लक्ष्मण महादेव गावडे, सदाशिव अर्जुन कोरगावकर, बाळू भिवा गावडे, अर्जुन भिकाई राऊळ, लक्ष्मण काशीराम पाटकर, महादेव मालू गावडे, सीताराम गंगाराम कामत, दिवाजी छोटू तिरपुडे, मिका पुंडलिक गावडे.

कुडाळ-महादेव तुकाराम वालावलकर, अनंत यशवंत गावडे, भास्कर राजाराम सुकी, श्रीपाद सदाशिव महाजन, महादेव भिकाजी आळवे, श्रीमती उषा गणपती वालावलकर, दत्ताराम रामचंद्र गवंडे, नारायण आत्माराम परब, सखाराम रामचंद्र म्हसकर, धाकू महादेव पालव, गणपती महादेव वालावलकर, सिंधू भास्कर सुकी, बाबू तुकाराम राणे, वामन मुकुंद तेरसे, लाडू यशवंत धुरी, सटवाजी गंगाराम कोरगावकर.

मालवण- विष्णू ज्ञानदेव कांदळगावकर, गणेश सूर्याजी बांदिवडेकर, गणपत महादेव राऊत, शिवराम नारायण कोळंबकर, मारुतीराम धोंडीराम शिर्सेकर, बाळकृष्ण सीताराम जाधव, सहदेव सीताराम खराडे, बाळकृष्ण शिवराम लुडबे, रामकृष्ण कृष्णाजी पराडकर, शंकर सीताराम कांबळी, महादेव भिकाजी बांदेकर, रामकृष्ण बाबूराव रावले, शाम ऊर्फ केशव गंगाराम कोचरेकर, पांडुरंग तुकाराम कांदळकर, गोपाळ घनशाम शिरोडकर, बाबू गावडे(सुकळवाड) गणपत तुकाराम तपकीरकर, वामन विष्णू कवठकर, वैकुंठगिरी अवदी, रामचंद्र शंकर गवाणकर, वसंत व्यंकोजी सामंत, बाबू बापू हडकर, रामचंद्र पांडुरंग बिले, वसंत आबाजी घाडी.

कणकवली- पुरुषोत्तम नारायण हर्णे, लिंगप्पा रामचंद्र उचले, तुकाराम रघुनाथ बिले, धोंडू रामचंद्र सावंत, जगन्नाथ सोनू राऊत, रामचंद्र विष्णू राणे, लक्ष्मण नाना सावंत, दत्ताराम राजाराम सावंत, रघुनाथ आत्माराम कदम, जगन्नाथ धाकू गावकर, कोरगावकर, हनुमंत धोंडू बागलकर, धाकू महादेव पालव.

देवगड- नारायण वासुदेव बर्वे, दिनकर मोतीराम कोरगावकर, गंगाधर कृष्णा मिराशी, शंकर गोविंद देऊलकर, भगवान शिवराम तावडे, विठ्ठल यशवंत रेझरकर आदी स्वातंत्र्यसैनिकांबरोबरच जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांची कर्तबगारी भारतमातेच्या रक्षणासाठी कार्यतत्पर होती. आज स्वातंत्र्याची किंमत आपल्याला वाटत नाही. परंतु ज्यांनी पारतंत्र्य अनुभवले आहे, त्यांना ६७ वर्षापूर्वीच मिळालेल्या स्वातंत्र्याची किंमत माहिती आहे. आजच्या पिढीने याची जाणीव ठेवायला हवी.

